

दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

RNI No. MAHMAR/2007/24252

तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25



अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २४९। किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | गुरूवार १५/१०/२०२६ । पाने- ६



दुष्काळात सरकारकडून मदतीची अपेक्षा - मा. मंत्री थोरात

थोरात कारखान्याचा गळीत हंगाम शुभारंभ



दिवाळीनिमित्त कामगारांना 20 टक्के बोनस व 30 दिवसांचे सानुग्रह अनुदान

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याने कायम सभासद, ऊस उत्पादक, शेतकरी व कामगार यांच्या जीवनामध्ये आनंद निर्माण केला असून दरवर्षीप्रमाणे दिवाळीनिमित्त यावर्षीही कामगारांना २० टक्के बोनस व ३० दिवसांचे अनुग्रह अनुदान दिले जाणार असल्याची घोषणा मा. कृषी व महसूल मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी यावेळी केली.

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - यावर्षी राज्यात दुष्काळाची परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. कारखान्याची संख्या वाढली असून प्रत्येक कारखान्याने आपली क्षमता वाढविली आहे. ग्रामीण भागात आर्थिक समृद्धी निर्माण करणारी साखर कारखानदारी अडचणीत आली आहे. ग्रामीण भागात पिण्याचे पाणी, चारा हे सर्व प्रश्न असून अशा गंभीर दुष्काळी परिस्थितीमध्ये सरकारने तातडीने निर्णय करून साखर कारखानदारीसह शेतकरी, शेतमजूर महिला व सर्वसामान्य नागरिकांना मदत करावी अशी अपेक्षा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, राज्याचे माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केली आहे.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या ६० व्या गळीत हंगाम शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मा.आ.डॉ.सुधीर तांबे, सौ. कांचनताई थोरात, सौ.दुर्गाताई तांबे, कारखान्याचे व्हा.चेअरमन पांडुरंग पाटील घुले, ड. माधवराव कानवडे, गणपतराव सांगळे, बाबा ओहोळ, रणजीतसिंह देशमुख, डॉ.जयश्रीताई थोरात, सुधाकर जोशी, शंकरराव खेमनर, संपतराव डोंगरे, इंद्रजीत थोरात, शरद थोरात, रामहरी कातोरे, संचालक संतोष हासे, इंद्रजीत खेमनर, संपतराव गोडगे, तुषार दिघे, विनोद हासे, सतीश वर्पे, रामदास धुळगंड, विलास शिंदे, रामनाथ कुटे, नवनाथ आरगडे, विजय राहणे, गुलाबराव देशमुख, योगेश भालेराव,अंकुश ताजणे, सौ.लताताई गायकर, सौ.सुंदराबाई डुबे, कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर आधी उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना मा. मंत्री थोरात म्हणाले की, राज्यामध्ये कारखान्यांची संख्या वाढली आहे. कमी दिवसांमध्ये जास्त गाळप करण्याकरता कारखान्यांनी आपली क्षमता वाढवली आहे.

(पान २ वर)

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी ५ हजारांची मदत

दुष्काळ निवारण्यासाठी सरकारकडून उपाय, आणखी ४० तालुक्यांत दुष्काळ जाहीर



मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने विविध उपाययोजनांची घोषणा केली आहे. आणखी ४० तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्यात आल्याने राज्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यांची संख्या ३०५ झाली आहे. दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात पाच हजार रुपये आगाऊ मदत जमा करण्याची घोषणा करण्यात आली असून, पिण्याच्या पाण्याचे टँकर वाढविणे, वीजबिल वसुलीतील सक्ती टाळणे, कर्जवसुलीबाबत बँकांना संयमाचे निर्देश आणि चारा खरेदी यांसारख्या उपाययोजनांवर सरकारने भर दिला आहे.

दुसरीकडे, सर्वसामान्य नागरिकांची अनधिकृत बांधकामांमुळे होणारी फसवणूक रोखण्यासाठी महसूल विभागाने दस्तनोंदणी प्रक्रियेत महत्त्वाचे बदल जाहीर केले आहेत. अनधिकृत इमारती आणि फ्लॅटच्या नोंदणीवर निर्बंध आणण्यासह कागदपत्रांची सात मुद्द्यांवर पडताळणी करण्याचा निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जाहीर केला आहे. त्यामुळे दुष्काळ निवारणासोबतच मालमत्ता व्यवहारांतील गैरप्रकार रोखण्याच्या दृष्टीनेही राज्य सरकारने पावले उचलली आहेत.

बँका आणि सोसायट्यांना कडक आदेश

शालेय फी माफीवरही त्यांनी प्रतिक्रिया दिली. फी माफीचा जीआर काढला होता. पण १९९२पासून त्या जीआरमध्ये काही अटी होत्या. त्यामुळे त्याचा सर्वांना फायदा होत नव्हता. ही गोष्ट लक्षात आल्यावर त्या अटी काढल्या आहेत. सरसकट निर्णय लागू केला आहे. जिल्हा बँका असतील, सोसायट्या असतील सर्वांना कडक आदेश दिले आहेत. कुणालाही तगादा लावू नका. काही लोकं अतिउत्साह दाखवत आहेत. त्यांनी अति उत्साह दाखवू नये, असे आदेश दिले आहेत. खासगी बँकांशीही चर्चा सुरू आहे, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासाठी दिवाळीपूर्वी पाच हजार रुपये आगाऊ रक्कम देण्याची घोषणा करण्यात आली आहे. पावसाअभावी शेतीचे नुकसान, पिण्याच्या पाण्याची टंचाई आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनत असताना या निर्णयाकडे शेतकऱ्यांना दिलासा देणारे पाऊल म्हणून पाहिले जात आहे.

मराठवाड्यात भूजल पातळी सुमारे तीन मीटरने खालावल्याचे निदर्शनास आले असून, पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यासाठी टँकरची संख्या वाढविण्यात येणार आहे. शेतकऱ्यांनी चारा किंवा चारा उत्पादन देणारी पिके घ्यावीत, असे आवाहनही सरकारकडून करण्यात आले आहे. उत्पादित चारा सरकार खरेदी करणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

(पान ३ वर)



ज्ञानेशकुमार मोदींसाठी काम करतात - दिपके




निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि ईव्हीएमच्या मुद्द्यावरून 'कॉकरोच जनता पार्टी' सध्या प्रचंड आक्रमक झाली आहे. सीजीपी चे संस्थापक अभिजीत दिपके यांनी नागपुरात बोलताना मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. तसेच, आपली पार्टी 'इंडिया' आघाडीच्या विरोधात नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे. तर दुसरीकडे, दिल्लीत जंतरमंतरवर आंदोलन करणाऱ्या सीपेपीच्या नेत्यांवर पोलिसांनी कारवाई केली असून, विशेष न्यायालयाने आशुतोष रांका आणि सौरव दास यांना पाच दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

अभिजीत दिपके यांनी निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर जोरदार हल्लाबोल केला. ते म्हणाले, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार हे निवडणुकांमध्ये फेरफार करत आहेत आणि नरेंद्र मोदी यांना सत्तेत टिकून राहण्यासाठी मदत करत आहेत. त्यांच्या या कारभाराविरुद्ध आम्ही लढत आहोत. सीजेपी ही स्वतंत्र संघटना असल्याचे सांगत दिपके यांनी 'इंडिया' आघाडीसोबतच्या त्यांच्या समीकरणावरही भाष्य केले. कॉकरोच जनता पार्टी हा एक स्वतंत्र दबाव गट आहे आणि भविष्यातही तो एक स्वतंत्र दबाव गटच राहील. पण याचा अर्थ असा नाही की आम्ही 'इंडिया' ब्लॉकच्या विरोधात आहोत. इंडिया आघाडी आणि आमचे आंदोलन (पान ६ वर)







नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून पाणी प्रश्न सोडविणार -आ. खताळ

पान १ वरून **दुष्काळात...**



युवावार्ता (प्रतिनिधी)

अनेक वर्षांपासून रखडलेल्या भोजापूर चारीच्या कामासाठी ४५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. तसेच प्रस्तावित दमणगंगा-वैतरणा नदीजोड प्रकल्पामध्ये या परिसरातील गावांचा समावेश करण्यात आला आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून परिसरातील पाण्याचा प्रश्न सोडवून भविष्यात महिलांच्या डोक्यावरील हंडा उतरविण्याचा आपला प्रयत्न राहणार असल्याचा विश्वास आमदार अमोल खताळ यांनी यांनी दिला .

नवरात्र उत्सवानिमित्त काकडवाडी येथील महालक्ष्मी माता तसेच निमोन येथील जगदंबा माता मंदिरात दर्शन घेतल्यानंतर आमदार खताळ यांनी या दोन्ही ठिकाणी सुरू असणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताहाला हजेरी लावली. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी सोपान महाराज शास्त्री आणि अभिषेक महाराज सांगळे यांचा आमदार खताळ यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

आमदार खताळ म्हणाले, की आमदारपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर गेल्या दोन वर्षांत प्रामाणिकपणे काम करण्याचा प्रयत्न केला आहे. तालुक्यातील प्रत्येक गावाला निधी देण्याचा प्रयत्न केला असून, आगामी काळातही विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आपण कमी पडणार नाही. 'मागणाऱ्याने मागत राहावे आणि देणाऱ्याने देत राहावे; मात्र मागणाऱ्याची झोळी फाटकी नसावी,' असा चिमटाही त्यांनी यावेळी काढला. काकडवाडी परिसरात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली होती. त्यावेळी स्वखर्चातून टँकर सुरू करून गावातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी हातभार लावला होता. मात्र, या भागातील पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटावा, हाच आपला प्रामाणिक हेतू आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

हिंदू संस्कृती आणि वारकरी संप्रदायातील धार्मिक कार्यक्रमांतून मिळणारी ऊर्जा, साधू-संतांचे आशीर्वाद आणि अध्यात्मातून मिळणारे ज्ञान अनमोल आहे. हे आशीर्वाद कोणत्याही बाजारात विकत मिळत नाहीत. संतांच्या विचारांतून अहंकार आणि विनम्रता यांतील फरक समजतो. तसेच समाजकारण आणि राजकारणात काम करताना नवी प्रेरणा मिळते. अध्यात्मातून मिळणारा आनंद समाजापर्यंत पोहोचविण्याचे काम संत-महंत करतात. आजच्या काळात देव, देश आणि धर्म या तीनही गोष्टींचे महत्त्व अधोरेखित करण्याचे काम धार्मिक व्यासपीठांवरून होत आहे, असे आमदार खताळ यांनी सांगितले.

दिवसेंदिवस उसाचे प्रमाण कमी होत चालले आहे. कारखान्यांमध्ये उसाची जीवघेणी स्पर्धा निर्माण झाली आहे. कारखानदारी अडचणीत आली आहे.

थोरात कारखान्याने कायम सभासद, शेतकरी, ऊस उत्पादक, कामगार यांचे हित जोपासले आहे. कार्यक्षेत्रात व बाहेरील सर्व शेतकरी, ऊस उत्पादक यांचा विश्वास संपादन केला असून त्यांच्या जीवनात आनंद निर्माण केला आहे. थोरात कारखान्याचे ९००० मे.टन क्षमतेच्या विस्तारीकरणाचे करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. अवघड परिस्थिती ही यावर्षी ११ लाख मे.टन गाळपाचे उद्दिष्ट आहे.

यावर्षीचा दुष्काळ अत्यंत अवघड आहे. खरीप हंगाम पूर्ण वाया गेला असून रब्बी होण्याची शक्यता नाही. पिण्याचा पाण्याचा प्रश्न, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. शेतमजुरांना काम नाही. शेतकऱ्यांसाठी पशुधन हे लक्ष्मी आहे त्यांची हाल पाहवत नाही. सरकारने आता पंचनामामध्ये टाइमपास न करता तातडीने निर्णय घेणे गरजेचे आहे. राज्यातील शेतकरी, शेतमजूर यांना दिलासा दिला पाहिजे. रोजगार हमीची कामे, चारा छावण्या याबाबत निर्णय झाले पाहिजे. सरकार मात्र पैशाचा आव आहे आणि जनता उपाशी ठेवत आहे. साधे संजय गांधी योजनेबतीत निराधार लोकांचे पैसे मिळाले नाहीत अशी वाईट अवस्था आहे.

यावर्षीचा दुष्काळ हा कोरोनाप्रमाणे संकट असून काटकसर, मेहनत, यामधून मार्ग काढत सर्वांची दिवाळी आनंदात करणार आहोत. कार्यक्षेत्रामध्ये हक्काचा ऊस वाढवणे अत्यंत गरजेचे आहे. कारखान्याकडून ऊस उत्पादकांना यावर्षीही चांगला भाव मिळणार असून कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादकांना २०० रुपयांचे अनुदान दिले जाणार आहे. अशा दुष्काळाच्या संकट काळात सरकारने कारखानदारी सह शेतकरी, शेतमजूर व सर्वसामान्य नागरिकांना तातडीने मदत करावी अशी अपेक्षा या निमित्ताने श्री. थोरात यांनी व्यक्त केली. तर कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर यांनी प्रास्ताविकात कारखान्याने सभासद, शेतकरी व कार्यक्षेत्रा बाहेरी ऊस उत्पादकांमध्ये विश्वासाचे नाते निर्माण केले आहे. ऑफ सीजन काळात कारखान्याची सर्व कामे वेळेत पूर्ण केली आहेत. याचबरोबर विस्तारीकरणाचे काम सुरू असल्याचे ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर यांनी केले तर व्हा. चेअरमन पांडुरंग पाटील घुले यांनी आभार मानले.

Yuvavarta.in
VISIT INSTAGRAM
daily_yuvavarta
VISIT Facebook
Daily yuvavarta

चैतन्य हॉस्पिटलच्या वर्धापन दिनानिमित्त रक्तदान शिबिर; अत्याधुनिक कॅथलॅबचे उद्घाटन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : आरोग्यसेवेत आधुनिक तंत्रज्ञानाची भर घालत हृदयविकाराच्या रुग्णांना अधिक दर्जेदार उपचार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने येथील प्रसिद्ध डॉ. नितीन जठार यांच्या चैतन्य हॉस्पिटलच्या वतीने अत्याधुनिक कॅथलॅब सुविधा सुरू करण्यात येत आहे. हॉस्पिटलच्या २१ व्या वर्धापन दिनानिमित्त शुक्रवार, १६ ऑक्टोबर २०२६ रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, त्याच दिवशी सकाळी १० वाजता अत्याधुनिक कॅथलॅबचा भव्य उद्घाटन समारंभ होणार आहे.

रक्तदान शिबिर सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले आहे. रक्तदानातून सामाजिक बांधिलकी जपण्यासोबतच रुग्णसेवेच्या क्षेत्रात आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा दुहेरी संकल्प या उपक्रमातून साध्य होणार आहे.

हृदयविकाराच्या रुग्णांसाठी वेळेवर निदान आणि योग्य उपचार अत्यंत महत्त्वाचे असतात. याच पार्श्वभूमीवर चैतन्य हॉस्पिटलमध्ये कॅथलॅब सुविधा सुरू होत असल्याने संगमनेर आणि परिसरातील रुग्णांना हृदयविकाराच्या तपासणी व उपचारांसाठी महत्त्वाची सुविधा उपलब्ध होणार आहे. हृदयविकाराशी संबंधित विविध प्रक्रिया, अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टी, पेसमेकर तसेच इतर आवश्यक तपासण्या व उपचारांसाठी आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला आहे.

हॉस्पिटलमध्ये कन्सल्टेशन, ईसीजी, २-डी इकोकार्डिओग्राफी, ब्लड व्हॉल्यूम संबंधित तपासण्या, स्ट्रेस टेस्ट, होल्टर मॉनिटरिंग, आयएबीपी सुविधा, अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टी आणि डिफिब्रिलेटर यांसारख्या सुविधा उपलब्ध असल्याची माहिती पत्रिकेत देण्यात आली आहे. तसेच सीटीओ अँजिओप्लास्टी, बायफरकेशन अँजिओप्लास्टी, लेफ्ट मेन अँजिओप्लास्टी, रेट्रोग्रेड अँजिओप्लास्टी, रोटा व आयव्हीयूएस मार्गदर्शित तसेच जटिल अँजिओप्लास्टीसारख्या प्रक्रियांचाही उल्लेख करण्यात आला आहे. याशिवाय रुग्णांसाठी २४ तास, सातही दिवस आपत्कालीन हृदयरोग सेवा उपलब्ध असल्याचे हॉस्पिटलने नमूद केले आहे. हृदयविकाराचे अचूक निदान, योग्य उपचार आणि परवडणाऱ्या दरात आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचा उद्देश या उपक्रमातून अधोरेखित होतो.

चैतन्य हॉस्पिटल (डॉ. जठार), डॉ. नागरे हॉस्पिटलसमोर, ताजणे मळा, नवीन नगर रोड, येथे हा कार्यक्रम होणार आहे. वर्धापन दिनानिमित्त आयोजित रक्तदान शिबिरात नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

संपर्क : ७०३८१७०३८२ / ०२४२५-२२४७६१.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीत माघारीचा धडाका

अहिल्यानगर - जिल्हा बँकेच्या निवडणुकीत मंगळवारी आणखी दोन इच्छुकांनी माघार घेतली असून यामुळे माघार घेतलेल्यांची संख्या आता पाच झालेली आहे. दरम्यान, जिल्हा बँक बिनविरोधच्या अजेंड्याखाली एकत्र आलेल्या माजी मंत्री बाळासाहेब थोरात व माजी खा. सुजय विखे पाटील यांच्या विरोधात कोण लढणार याबाबत जिल्हाभरात उत्सुकता निर्माण झाली आहे.जिल्हा बँकेचे निवडणुकीसाठी येत्या २१ तारखेपर्यंत उमेदवारी माघारीची मुदत आहे. जिल्ह्यात छाननीनंतर २५० हून अधिक उमेदवार यांच्या अर्ज पात्र ठरलेले असून यापैकी अवघ्या पाच इच्छुकांनी आत्तापर्यंत माघार घेतलेली आहे. आता माघारीची मुदत जवळ येत असल्याने नेत्यांसह सर्वांची उत्सुकता ताणली गेली आहे. बँकेच्या रिंगणातून कोण माघार घेणार आणि कोण लढणार याकडे सर्वांच्या नजरा टिकलेल्या आहेत. दरम्यान बिनविरोधच्या अजेंड्याखाली एकत्र आलेल्या विखे- थोरात यांना जिल्ह्यातून कोण टक्कर देणार, दोन दिवसापूर्वी जिल्ह्यातील एका राजकीय गटांनी राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतलेल्या असून पवार या निवडणुकीत जीव ओतणार की लांबूनच बागेची भूमिका घेणार याकडे जिल्ह्याचे लक्ष राहणार आहे.बँकेचे या निवडणुकीत विद्यमान आमदार मोनिकाताई राजळे, किरण लहामटे, विवेक कोल्हे, अक्षय कर्डिले, काशिनाथ दाते, प्राजक्त तनपुरे, आशुतोष काळे, विठ्ठलराव लंघे, माजी मंत्री शंकरराव गडाख, माजी आमदार वैभव पिचड, माजी खासदार सुजय विखे पाटील, माजी आमदार चंद्रशेखर घुले, राहुल जगताप यासह अन्य इच्छुक यांनी उमदेवारी दाखल केल्या होत्या.

नोकरीची सुवर्णसंधी

'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'

(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे

पदे: Field Sales Executive
Business Development Manager

कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग

पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक

सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा

RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

राज्यातील महामार्गांवर नववर्षात 'हवाई रुग्णवाहिका' सेवा सुरू होणार

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची घोषणा



मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील महामार्गांवर होणाऱ्या गंभीर रस्ते अपघातांतील जखमींना वेळेत वैद्यकीय उपचार मिळावेत आणि त्यांचे प्राण वाचविण्यास मदत व्हावी, या उद्देशाने 'हवाई रुग्णवाहिका' सेवा सुरू करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. अपघातानंतरचा पहिला तास, म्हणजेच 'गोल्डन अवर', हा जखमींच्या उपचारांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असतो. या निर्णायक काळात जखमींना तातडीने ट्रॉमा केअर सेंटरपर्यंत पोहोचविण्यासाठी हवाई रुग्णवाहिका सेवा प्रभावी ठरू शकते, अशी घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मंगळवारी केली.

मंत्रालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीला आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, गृहराज्यमंत्री योगेश कदम, परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, आरोग्य विभागाचे संचालक संजय काटकर, वाहतूक पोलीस विभागाचे अधीक्षक डॉ. सुनील भारद्वाज यांच्यासह मोटार वाहन विभाग, आरोग्य विभाग आणि पोलीस प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या प्रकल्पासाठी १५ नोव्हेंबरपर्यंत प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) तयार करून तिला मंजुरी घेण्याचे नियोजन आहे. त्यानंतर नोव्हेंबरअखेर उच्चाधिकार समितीची मंजुरी घेऊन निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. या प्रक्रियेनंतर नवीन वर्षाच्या सुरुवातीला हवाई रुग्णवाहिका सेवा सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. राज्यात दरवर्षी सुमारे १५ हजार रस्ते अपघात होत असल्याची माहिती आहे. यापैकी अनेक अपघातांमध्ये जखमींना वेळेत उपचार मिळणे हे मोठे आव्हान ठरते. विशेषतः महामार्गांवरील गंभीर अपघात, वाहतूक कोंडी, रुग्णालयापर्यंतचे अंतर आणि आपत्कालीन वैद्यकीय सुविधांची उपलब्धता या बाबी लक्षात घेता, अपघातग्रस्तांना तातडीने उपचार मिळण्यासाठी अधिक सक्षम यंत्रणा उभारण्याची आवश्यकता आहे.

मंत्री नितेश राणे यांनी मांडला महाराष्ट्राच्या सागरी विकासाचा आराखडासमृद्धी महामार्ग, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग आणि मुंबई-गोवा महामार्ग या महत्वाच्या मार्गांवर अपघातग्रस्तांना जलद वैद्यकीय मदत मिळावी, यासाठी विशेष यंत्रणा उभारण्याचे नियोजन आहे. या यंत्रणेअंतर्गत हवाई रुग्णवाहिका सेवेची उपलब्धता, जखमींना सुरक्षितपणे ट्रॉमा केअर सेंटरपर्यंत पोहोचविण्याची कार्यपद्धती आणि विविध आपत्कालीन यंत्रणांमधील समन्वय यांवर विशेष भर देण्यात येणार आहे. हवाई रुग्णवाहिका सेवेसह अपघातग्रस्तांना तातडीने मदत मिळण्यासाठी परिवहन विभाग, आरोग्य विभाग आणि पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने प्रमाणित कार्यपद्धती निश्चित करण्यात येणार आहे. यासाठी ट्रॉमा केअर सेंटरचे जाळे निश्चित करणे, सेवा पुरवठादारांचे पॅनेल तयार करणे, रस्ता सुरक्षा निधीतून आवश्यक आर्थिक तरतूद करणे आणि आपत्कालीन प्रतिसादासाठी प्रमाणित कार्यपद्धती विकसित करणे, अशा उपाययोजनांवर भर दिला जाणार आहे.

राज्यातील अनधिकृत बांधकामाच्या दस्तांची नोंदणी बंद

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची घोषणा



मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यात सक्षम प्राधिकरणाची परवानगी न घेता उभारल्या जाणाऱ्या अनधिकृत इमारती, झोनिंग न पाहता झालेले बांधकाम आणि बेकायदेशीर फ्लॅट विक्रीच्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी राज्य सरकारने अत्यंत कठोर पाऊल उचलले आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अनधिकृत बांधकामांच्या दस्तांची नोंदणी तात्काळ थांबवण्याचा निर्णय मंगळवारी घेतला. महसूल विभागाने परिपत्रक जारी करून राज्यातील सर्व दुय्यम निबंधकांना नवीन नियमावलीचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश दिले आहेत.मुंबई मेट्रोपॉलिटन विभाग (एमएमआर), ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवड, हवेली, मुळशी, नागपूर यांसह राज्यातील विविध शहरांमधील उपनगरीय भागांत रहिवासी झोन नसताना इमारती उभारणे, 'रेरा' नोंदणी न करणे आणि मंजूर क्षेत्रापेक्षा जास्त बांधकामाची विक्री करून नागरिकांची आर्थिक फसवणूक करण्याचे प्रमाण वाढले होते. विधानमंडळातही या संदर्भात लोकप्रतिनिधींकडून अनेक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या गैरकारभाराला पायबंद घालण्यासाठी आणि सर्वसामान्य खरेदीदारांचे हित जपण्यासाठी सरकारने ही नियमावली लागू केली आहे. महारेरा कायद्यानुसार नोंदणी आवश्यक असलेल्या प्रकल्पांतील फ्लॅटच्या पहिल्या विक्रीसाठी नोंदणी प्रमाणपत्र, भोगवटा प्रमाणपत्र आणि मंजूर नकाशा जोडणे बंधनकारक असेल. रेरा नोंदणीची गरज नसलेल्या प्रकल्पांसाठी सक्षम प्राधिकरणाचे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र (सीसी), मंजूर नकाशा, झोन दाखला आणि मोजणी नकाशा सादर करावा लागेल.

दस्तऐवजात नमूद फ्लॅटचे क्षेत्रफळ मंजूर नकाशातील क्षेत्रफळापेक्षा जास्त असल्यास अशा दस्तांची नोंदणी दुय्यम निबंधकांना करता येणार नाही. युडीसीपीआर, डी.पी. प्लॅन किंवा प्रादेशिक योजनेच्या नियमांचे पालन न केलेल्या अनधिकृत इमारतींमधील फ्लॅटची थेट विक्री करता येणार नाही. अशा इमारती नियमानुकूल करूनच विकाव्या लागतील. ज्या इमारती नियमानुकूल होऊ शकत नाहीत, त्या कायदेशीर ठरू शकणार नाहीत. त्या पाडण्याची कार्यवाही केली जाईल. शासनाच्या आदेशांचे उल्लंघन करून अनधिकृत बांधकामांच्या दस्तांची जाणीवपूर्वक नोंदणी करणाऱ्या दुय्यम निबंधकांवर थेट विभागीय चौकशी सुरू केली जाईल, असा इशारा देण्यात आला आहे.

सर्व सामान्यांची आयुष्यभराची पुंजी अनधिकृत बांधकामांमध्ये गुंतवून त्यांची फसवणूक होण्याचे प्रकार थांबवणे ही सरकारची प्राथमिक जबाबदारी आहे. अनेकदा नागरिक विश्वासाने सदनिका खरेदी करतात, मात्र नंतर ती अनधिकृत असल्याचे निष्पन्न झाल्यावर त्यांचे मोठे आर्थिक नुकसान होते. अशा गैरप्रकारांना कायमचा आळा घालण्यासाठी हा निर्णय घेतला असल्याची प्रतिक्रिया महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे.

आईच्या कष्टांना मिळाला सन्मानाचा मुकुट

नीलम खताळ यांच्याकडून कष्टकरी मातांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव

युवावार्ता (प्रतिनिधी)

आईच्या कष्टांना यशाची किनार लाभते, तेव्हा तिच्या संघर्षाचे सार्थक होते. स्वतःच्या आयुष्यात कितीही संकटे आली, तरी मुलांच्या शिक्षणात कोणतीही कमतरता राहू नये, या साठी अहोरात्र कष्ट करणाऱ्या गोरगरीब आणि कष्टकरी महिला या समाजाच्या खऱ्या नवदुर्गा आहेत. अशा तळागाळातील, मात्र प्रसिद्धीच्या झोतात कधीही न आलेल्या कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्याचा आगळावेगळा उपक्रम आमदार अमोल खताळ यांच्या पत्नी तथा आदिशक्ती फाउंडेशनच्या अध्यक्षा नीलम खताळ यांनी हाती घेतला आहे. या उपक्रमा च्या अंतर्गत ज्या मातांनी आपल्या मुलांवर संस्कार करून त्यांना घडविले, त्यांचाच सन्मान त्यांच्या उच्चशिक्षित मुलांच्या हस्ते करण्यात येत आहे.

नवरात्रोत्सवात देवीच्या विविध रूपांची पूजा केली जाते. मात्र, आपल्या घरात राहून मुलांच्या शिक्षणासाठी आणि त्यांच्या उज्वल भविष्यासाठी आयुष्य वेचणाऱ्या महिलांमधील आदिशक्तीची ओळख समाजाला व्हावी, या भावनेतून सौ नीलम खताळ यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत नीलम खताळ स्वतः नवदुर्गांच्या घरी जाऊन त्यांच्या उच्चशिक्षित मुलांच्या हस्ते सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव करीत आहेत. हा सन्मान केवळ एका महिलेचा गौरव न राहता, आईच्या त्यागाची जाणीव मुलांना करून देणारा आणि कुटुंबातील प्रेम, कृतज्ञता व संस्कार अधोरेखित करणारा भावनिक सोहळा ठरत आहे.

समाजात अनेकदा मोठ्या पदांवर पोहोचलेल्या व्यक्तींच्या यशाची चर्चा होते; मात्र त्या यशामागे असलेल्या आईच्या कष्टांची कहाणी पडद्या आडच राहते. शेतात राबणारी, शेतमजुरी करणारी, रोजंदारीवर धुनी भांड्याचे काम करणारी किंवा घराची संपूर्ण जबाबदारी सांभाळत मुलांच्या शिक्षणासाठी धडपडणारी आई आपल्या मुलांच्या भविष्यासाठी स्वतःच्या सुखाचा त्याग करते. संगमनेरमध्ये राबविण्यात येणारा हा उपक्रम केवळ सत्कारापुरता मर्यादित न राहता मातृत्वाचा गौरव करणारा आणि शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करणारा सामाजिक उपक्रम ठरत आहे.



देवीची पूजा मंदिरात होते; पण कुटुंबाचे भविष्य घडविणाऱ्या आईच्या कष्टांची पूजा तिच्याच घरात व्हावी, हीच या उपक्रमामागील खरी भावना आहे. नवरात्रोत्सवातील शक्तीच्या उपासनेला सामाजिक संवेदनशीलतेची जोड देत, आपल्या मुलांच्या यशामागील खऱ्या शिल्पकार असलेल्या मातांचा सन्मान करण्याचा हा उपक्रम एक आदर्श परंपरा निर्माण करणारा ठरत असल्याचे आदिशक्ती फाउंडेशनच्या अध्यक्षा नीलम खताळ यांनी सांगितले.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

पिके करपली, चारा संपला; शेतकऱ्यांना तातडीच्या मदतीची गरज - माजी मंत्री थोरात



माजी मंत्री बाळासाहेब थोरात हे शेतकऱ्यांचे व सर्वसामान्यांचे नेते म्हणून राज्याला परिचित आहेत. सोमवारी दिल्लीमध्ये खासदार राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली आंदोलनामध्ये ते सहभागी होते. यापूर्वी राज्यामध्ये दुष्काळ जाहीर करावा म्हणून त्यांनी सातत्याने मागणी केली असून संगमनेर मध्ये मोठा मोर्चा काढला. त्यानंतर राज्यामध्ये दुष्काळ जाहीर झाला. मुंबईमध्ये ठाकरे बंधूंच्या मोर्चा, पुणे येथील एमपीएससीचे आंदोलन, दिल्लीमध्ये राहुल गांधी यांच्या मोर्चात सहभागी झाल्यानंतर शेतकऱ्यांचे नेते असलेले बाळासाहेब थोरात ही रात्री उशिरा दिल्लीतून परतल्यानंतर सकाळी आठ वाजता पठार भागातील शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचले.

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात दुष्काळाची भयान परिस्थिती निर्माण झाली आहे. पिण्याचे पाणी, पशुधनासाठी चारा, असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. सरकारने आता पंचनाम्यात वेळ न घालवता सरसकट सर्व दुष्काळग्रस्तांना भरीव मदत केली पाहिजे. हे सरकार फक्त घोषणाबाजी करत असून आता घोषणा नको तर प्रत्यक्ष अंमलबजावणी करून दुष्काळग्रस्तांना तातडीने मदत करा अशी आग्रही मागणी माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केली आहे.

पठार भागातील हिवरगाव पठार, जांभुळवाडी, मांडवे, बिरेवाडी, कवठे मलकापूर, सुळकेवाडी, चौधरवाडी, कणसेवाडी, कुंभारवाडी, दरेवाडी, रणखांब ,पिंपळगाव देपा, या गावांमधील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी पाहणी करत दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा दिला. यावेळी समवेत सभापती शंकरराव खेमनर, बाळासाहेब सागर, मीराताई शेटे, जयराम ढेरंगे, सुजित खेमनर, सुदाम सागर, शिवाजी साकुरे, शशिकांत बेरड, लक्ष्मण गीते यांच्यासह कार्यकर्ते व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी राज्याचे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जात सोयाबीन, भुईमूग, बाजरी या पिकांची पाहणी केली. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा दिला .

यावेळी बोलताना माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, अलनिनोच्या प्रभावामुळे राज्यामध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे ग्रामीण महाराष्ट्रात अत्यंत अवघड परिस्थिती आहे. हाताशी आलेली पिके करपून गेली आहे. सोयाबीन काढण्याची परिस्थिती नाही. शेतीचे उत्पन्न होणार नाही. चारा नसल्याने पशुधनाचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

पिण्याचे पाणी, पशुधनासाठी पाणी व चारा याचबरोबर हातावर काम करणारे अनेक शेतमजूर आहेत ज्यांना दुष्काळामुळे रोजगारी नाही. दोन वेळच्या अन्नाची भ्रांत आहे. अशा सर्व नागरिकांना सरकारने तातडीने मदत केली पाहिजे. शेतमजुरांना मिळणारा रोजगार सुद्धा दिला पाहिजे. पाणी चारा यांची व्यवस्था करा त्याचबरोबर पंचनामांमध्ये वेळ न घालवता तातडीने सरसकट मदत करावी. ग्रामीण भागातील गावांमध्ये अनेक अकुशल कामगार आहेत. त्यांचे मागील सहा महिन्यापासून चे पगार शासनाने दिले नाहीत. त्यांच्या जेवणाचा प्रश्न आहे. मुलांच्या शाळेचा प्रश्न आहेत. अनंत अडचणी आहेत. त्याकडे शासनाचे दुर्लक्ष आहे. इतकेच काय तर संजय गांधी निराधार योजनेचे पैसे सुद्धा मागील सहा महिन्यापासून नागरिकांना दिलेली नाही अशी वाईट अवस्था आहे. घोषणा मात्र मोठमोठ्या होत आहेत. आता निव्वळ घोषणा नको निर्णय करावा व तातडीने अंमलबजावणी करावी आणि राज्यातील शेतकरी व दुष्काळग्रस्तांना भरी मदत करावी अशी मागणी काँग्रेसचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी यावेळी केली आहे.

यावेळी माजी मंत्री थोरात यांनी शेतकरी महिला व युवकांशी संवाद साधला .अनेक महिलांनी व्यथा मांडताना त्यांच्या डोळ्यांमध्ये अश्रू आले. साहेब तुम्हीच आता आम्हाला वाचवा. हे सरकार काही कामाचे नाही. साहेब तुम्हीच आमचे सरकार आहात यावेळी काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी या महिला व नागरिकांना दिलासा देत आपण तुमच्या पाठीशी आहोत तुमच्यासाठी सातत्याने संघर्ष करू असे सांगितले.

४५ संघावर मात करत सह्याद्री विद्यालयाचा कबड्डीत डंका!

तालुकास्तरीय स्पर्धेत १४ वर्षांखालील संघाने पटकावले विजेतेपद



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुकास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धेत भाऊसाहेब गुंजाळ पाटील सह्याद्री विद्यालयाच्या १४ वर्षांखालील मुलांच्या संघाने दिमाखदार कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. तालुक्यातील तब्बल ४५ शाळांनी सहभाग घेतलेल्या या स्पर्धेत सह्याद्री विद्यालयाच्या खेळाडूंनी उत्कृष्ट सांघिक खेळ, जिद्द, चिकाटी आणि कौशल्याच्या जोरावर विजेतेपदाला गवसणी घातली.

या स्पर्धेत विविध शाळांच्या संघांमध्ये चुरशीच्या लढती रंगल्या. मात्र, सह्याद्री विद्यालयाच्या खेळाडूंनी मैदानावर प्रभावी खेळाचे प्रदर्शन करत प्रतिस्पर्ध्यांवर मात केली. खेळाडूंमधील उत्तम समन्वय, आक्रमक चढाया, भक्कम पकडी आणि विजयासाठीची जिद्द यामुळे संघाने स्पर्धेत आपले वर्चस्व सिद्ध केले. ४५ शाळांच्या सहभागातून मिळविलेल्या या यशामुळे सह्याद्री विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. क्रिडा शिक्षक किशोर देशमुख, मिलिंद औटी, आशिष पवार आणि अर्जुन केलकट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केले. शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन, खेळाडूंची मेहनत आणि संघभावनेच्या बळावर मिळालेल्या या विजयाचे क्रीडाप्रेमींकडून कौतुक होत आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक खेमनर एस. एम., उपमुख्याध्यापिका सौ. सुरेखा दिघे, पर्यवेक्षक किशोर देशमुख, अण्णासाहेब दिघे तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विजयी संघाचे अभिनंदन केले.

सह्याद्री विद्यालयाच्या खेळाडूंनी कबड्डीच्या मैदानात मिळविलेल्या या यशामुळे विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील नावलौकिकात भर पडली आहे. या विजयी संघाचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

विजेतेपद मिळविणारे संघातील खेळाडू – कार्तिक काळे (कर्णधार), दर्शन पानसरे, सोहम वैराळ, आर्यन कुटे, कवी अहिरे, साई वाकचौरे, अवनीश धडवाद, यश वैद्य, आयुष दातीर, समर मोहारे, रुद्राक्ष राऊत.

पान १ वरून दुष्काळग्रस्त...

दुष्काळग्रस्त भागातील शेतकरी आणि नागरिकांना वीजबिल भरण्यासाठी सक्तीने तगादा लावू नये, असे निर्देश देण्यात आले आहेत. वसुलीच्या नावाखाली अतिउत्साह दाखविणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा इशाराही सरकारने दिला आहे. तसेच कर्जवसुलीसाठी बँकांनीही शेतकऱ्यांवर अनावश्यक दबाव आणू नये, अशी भूमिका मांडण्यात आली आहे. खासगी बँका आणि मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या वसुलीच्या पद्धतींबाबतही चर्चा करण्यात येणार आहे. याशिवाय, शैक्षणिक शुल्कमाफीच्या शासन निर्णयातील अटी व शर्ती हटविण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला आहे.

राज्यात १६ हजार अनधिकृत वीजजोडण्या तोडण्यात आल्याची माहितीही देण्यात आली आहे. दरम्यान, अनधिकृत बांधकामे करून फ्लॅट विकणाऱ्या बिल्डरांकडून नागरिकांची फसवणूक होऊ नये, यासाठी महसूल विभागाने दस्तनोंदणी प्रक्रियेत कडक पडताळणीची व्यवस्था करण्याचा निर्णय घेतला आहे. यापुढे युडीसीपीआर (णऊउझठ), विकास आराखडा (डीपी प्लॅन) आणि प्रादेशिक आराखड्यातील (रिजनल प्लॅन) नियमांचे उल्लंघन करणाऱ्या तसेच आवश्यक मंजुरी नसलेल्या इमारती आणि फ्लॅटच्या नोंदणीवर निर्बंध राहणार आहेत.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले की, बांधकामासाठी संबंधित सक्षम प्राधिकरणाची आवश्यक परवानगी आणि लागू नियमांचे पालन महत्त्वाचे असेल. ज्या इमारतींमधील त्रुटी कायदेशीररीत्या दूर करता येऊ शकतात, त्यांचे नियमांनुसार नियमितीकरण करावे लागेल. मात्र, ज्या बांधकामांचे नियमितीकरण कायद्याने शक्य नाही, त्यांना कायदेशीर मान्यता मिळू शकणार नाही.

रेरा (ठएठ-) कायद्यानुसार आवश्यक नोंदणी आणि संबंधित विकास प्राधिकरणांच्या परवानग्या घेऊनच बांधकाम व विक्री प्रक्रिया करावी, यावरही सरकारने भर दिला आहे. यामुळे घर खरेदीसाठी आयुष्यभराची पुंजी खर्च करणाऱ्या नागरिकांना अनधिकृत बांधकामांच्या व्यवहारांपासून संरक्षण मिळण्याची अपेक्षा आहे.

दस्तनोंदणीतील गैरप्रकार रोखण्यासाठी अर्जासोबत सादर होणाऱ्या कागदपत्रांची सात महत्त्वाच्या मुद्द्यांवर तपासणी करण्यात येणार आहे. दस्तनोंदणीचा उद्देश, संबंधित मालमत्तेची माहिती, आवश्यक परवानग्या आणि नोंदणीसाठी दुसरा तालुका निवडल्यास त्यामागील कारण यांची पडताळणी केली जाणार आहे.

तसेच राज्यात 'एक जिल्हा, एक नोंदणी' ही सुविधा लागू करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. दस्तनोंदणीची प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्यासाठी संबंधित सह दुय्यम निबंधक आणि सह जिल्हा निबंधक यांच्यामार्फत नोंदणी केली जाणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

दुष्काळामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना मदत देणे, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता वाढविणे आणि वसुलीतील सक्ती टाळणे, या उपाययोजनांमुळे ग्रामीण भागाला दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. त्याचवेळी अनधिकृत बांधकामांच्या दस्तनोंदणीवर निर्बंध आणि कागदपत्रांच्या कठोर पडताळणीमुळे मालमत्ता व्यवहारांतील पारदर्शकता वाढविण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.णी किती प्रभावीपणे होते,

ग्रामपंचायत बाभूळवाडे, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर ब –१ निविदा नोटीस

प्रशासक/ ग्रामपंचायत अधिकारी ग्रा.पं. बाभुळवाडे, ता. पारनेर जि.अहिल्यानगर यांचेकडून खालील कामांचे जिल्हा परिषद अहिल्यानगर सा. बा. विभाग यांचे कडील नोंदणीकृत सीलबंद ब १ दोन किंवाटदाराकडून लफाफा पद्धतीने ब १ निविदा मागविण्यात येत आहे.

अ. क्रं.	कामाचे नाव	योजना	निविदा विक्री	बयाणा रक्कम	निविदा रक्कम	कामाची मुदत	वर्गवारी
१.	मौजे बाभूळवाडे येथे समतानगर येथे काँक्रीट रस्ता करणे	अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे २०२५-२६	५९०/-	--	४०२०४७/-	६ महिने	सु.बे.
२.	मौजे बाभूळवाडे येथे समतानगर येथे समाजमंदिर दुरूस्ती करणे	अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे २०२५-२६	२३६/-	१%	८४१७०/-	६ महिने	खुला

कामाच्या शर्ती व अटीबाबतची माहिती ग्रामपंचायत **बाभूळवाडे** कार्यालयात दि. **१५/१०/२०२६ ते दि. २१/१०/२०२६** या कालावधीत कार्यालयीन वेळेत सीलबंद निविदा दि. २१/१०/२०२६ रोजी संध्याकाळी ठीक ०६.०० वाजेपर्यंत स्वीकारणेत येतील. त्याबाबत अटी शर्ती बाबत माहिती ग्रा. पं.बाभूळवाडे येथे उपलब्ध आहे. दरपत्रक स्वीकारण्याचा अगर नाकारण्याचा अधिकार सरपंच/ग्रामपंचायत अधिकारी **बाभूळवाडे** यांनी राखून ठेवला आहे. निविदा उघडण्याची प्रक्रिया **दि. २२/१०/२०२६** रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता ग्रामपंचायत **बाभूळवाडे** ता. पारनेर जि. अ.नगर येथे पार पडेल. निविदा फॉर्म सोबत १) नोंदणी प्रमाणपत्र २) जीएसटी नंबर ३) पॅनकार्ड ४) आयकर विवरण ५) ब १ निविदा फॉर्म ६) बंधपत्र १०० स्टॅम्प पेपर वर ७) कामाचे अनुभव दाखले (सु. बे. साठी सुरूवातीचे ३ वर्षापर्यंत कामाचे अनुभव दाखले साठी सुट राहील. नवीन नोंदणी असले बाबतचे प्रतिज्ञापत्र १०० च्या स्टॅम्प पेपर वर जोडणे आवश्यक राहील) ८) वयाणा रक्कम (सुवेसाठी प्रमाणपत्रावर सुटचा उल्लेख असणे गरजेचे आहे) व निविदा फी भरलेली पावती (सामान्य पावती) व आवश्यक कागदपत्रे जोडावीत.

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रा.पं. बाभूळवाडे, ता. पारनेर, जि. अ.नगर

प्रशासक
ग्रा.पं. बाभुळवाडे, ता. पारनेर, जि. अ.नगर

राधाकिसन बाबुराव सहाणे यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - देवठाण येथील जुन्या पिढीतील वारकरी संप्रदाय चे व्यक्तिमत्व हभप राधाकिसन बाबुराव सहाणे यांचे वृद्धापकाळाने वयाच्या ८२ व्या वर्षी निधन झाले.

ते रेणुका जलसिंचन उपसा सिंचन सहकारी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष होते. अखंड हरिनाम सप्ताह व श्रीराम नवमी उत्सव मध्ये सक्रिय सहभाग असत. विडी कामगार प्रश्नांसाठी आंदोलनात भाग घेतला त्यात अनेक वेळा तुरुंगवास झाला आहे.

त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना, नातवंड, पतवंडे असा परिवार आहे. अगस्ती साखर कामगार पतसंस्थेचे संचालक ज्ञानेश्वर सहाणे, संजय सहाणे, राजेंद्र सहाणे यांचे ते वडील तर साईबाबा विद्यालय मन्याळे च्या शिक्षिका वंदना सहाणे यांचे सासरे, ऋषिकेश सहाणे, ड संकेत सहाणे यांचे आजोबा होते.

देवठाण ता. अकोले येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

'सर्व्हर डाऊन': तांत्रिक अडचण की सोयीस्कर ढाल?

ऑनलाईन कारभाराच्या झगमगाटात भरडला जाणारा सामान्य नागरिक

आज सर्व्हर डाऊन आहे, उद्या या...

साईट चालत नाहीये, लिंक आली की बघू... वरूनच सिस्टीम बंद आहे, आम्ही तरी काय करणार?

कोणत्याही शासकीय कार्यालयाची किंवा सेतू केंद्राची पायरी चढणाऱ्या प्रत्येक सामान्य नागरिकाच्या कानावर रोज पडणारी ही प्रातिनिधिक वाक्ये! आज आपण डिजिटल इंडिया ई-गव्हर्नन्स आणि पेपरलेस प्रशासना'च्या गगनभरारीच्या गप्पा मारत आहोत. शासकीय सेवा ऑनलाईन झाल्यामुळे कारभारात पारदर्शकता येईल, नागरिकांच्या वेळेची बचत होईल आणि भ्रष्टाचाराला आळा बसेल, असा एक अत्यंत उदात्त हेतू यामागे होता. परंतु, आजची प्रत्यक्ष वस्तुस्थिती काय आहे? ऑनलाईनच्या या झगमगाटात सामान्य नागरिक मात्र सर्व्हर डाऊन च्या अंधाऱ्या गर्तेत पुरता भरडला जात आहे.

तांत्रिक अडचण की सोयीस्कर ढाल?

शासकीय संकेतस्थळे (Websites) आणि पोर्टल्स वारंवार बंद पडण्यामागे तांत्रिक कारणे जरूर असतात. एकाच वेळी लाखोंच्या संख्येने येणारा ट्रॅफिक पेलण्याची क्षमता नसलेले कमजोर सर्व्हर्स,



वेळेत न होणारे टेक्निकल मेंटेनन्स, आणि एन.आय.सी.' (NIC) किंवा खाजगी कंत्राटदारांवर असणारे अवाजवी अवलंबित्व; या सर्वांमुळे साईट्स क्रॅश होतात, हे वास्तव नाकारता येत नाही. दाखले, पीक विमा, शिष्यवृत्ती किंवा नोकरभरतीची अंतिम तारीख जवळ आली की ही ऑनलाईन सिस्टीम पत्त्याच्या बंगल्यासारखी कोसळते. पण या तांत्रिक सत्याच्या पलीकडे एक कटू प्रशासकीय सत्यही दडलेले आहे.

अनेकदा साईट चालत नाही हे उत्तर कर्मचाऱ्यांसाठी एक सोयीस्कर ढाल बनते! कामाचा ताण टाळण्यासाठी, अर्जांची छाननी लांबणीवर टाकण्यासाठी किंवा स्वतःच्या कामातील दिरंगाई झाकण्यासाठी वरूनच सर्व्हर बंद आहे असे सांगून सर्वसामान्यांना माघारी धाडणे आता अत्यंत सोपे आणि सवयीचे झाले आहे.

सामान्यांची परवड आणि आयुष्याचा अपव्यय

ग्रामीण भागातून किंवा दूरवरून स्वतःचे रोजंदारीचे काम सोडून, पदरमोड करून शासकीय कार्यालयात येणाऱ्या शेतकरी, कष्टकरी आणि विद्यार्थ्यांचे हाल शब्दातीत आहेत.

विद्यार्थी: वेळेत दाखला न मिळाल्यामुळे कित्येक गुणवंत विद्यार्थ्यांचे प्रवेश प्रक्रियेतील अख्खे वर्ष वाया जाते.

शेतकरी: पीक विम्याचा किंवा अनुदानाचा फॉर्म भरायचा राहून गेल्याने नैसर्गिक आपत्तीत शेतकरी हक्काच्या मदतीपासून वंचित राहतो.

ज्येष्ठ नागरिक: वृद्ध आणि निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना आपल्या हक्काच्या तुटपुंज्या मानधनासाठी महिनोनमहिने सेतू केंद्रांचे हेलपाटे मारावे लागतात.

डिजिटल क्रांतीचा मुख्य उद्देश नागरिकांचे जिणे सुलभ (Ease of Living) करण्याचा होता; परंतु, योग्य नियोजन आणि सक्षम पायाभूत सुविधांअभावी तीच क्रांती आज सामान्यांच्या मुळावर आल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे.

रस्ता काय आणि बदल कसा होणार?

प्रशासकीय यंत्रणेने आता केवळ ऑनलाईन पोर्टल्स तयार करून आणि प्स लॉन्च करून हात वर करून चालणार नाही, तर त्या पोर्टल्सची विश्वासार्हता आणि क्षमता वाढवणे गरजेचे आहे.

सर्व्हर क्षमता (Auto-scaling Cloud Services): शासकीय पोर्टल्ससाठी आधुनिक क्लाऊड तंत्रज्ञानाचा वापर करून ट्रॅफिकनुसार सर्व्हरची क्षमता आपोआप वाढेल अशी व्यवस्था करणे अनिवार्य आहे.

पर्यायी ऑफलाईन व्यवस्था: जेव्हा एखादी साईट सलग २४ तास बंद राहते, तेव्हा तातडीने जुन्या पद्धतीनुसार ऑफलाईन अर्ज स्वीकारण्याची लवचिकता प्रशासनाने दाखवली पाहिजे. पारदर्शकता आणि डिजिटल ऑडिट: महाराष्ट्र लोकसेवा हक्क कायद्यांतर्गत ठरवून दिलेल्या मुदतीचे तंतोतंत पालन झालेच पाहिजे. जर तांत्रिक बिघाडामुळे काम रखडले असेल, तर त्याची नोंद सार्वजनिक डॅशबोर्डवर दिसली पाहिजे, जेणेकरून कर्मचाऱ्यांना मनमानी ढाल वापरता येणार नाही.

डिजिटल क्रांती हे 'साधन' आहे, 'साध्य' नाही!

डिजिटायझेशन हे जनतेच्या सेवेचे एक माध्यम आहे. जर हे माध्यमच वारंवार निकामी होणार असेल, तर लोकशाहीतील सर्वसामान्य माणूस या प्रशासकीय सिस्टीमवर कसा विश्वास ठेवणार? साईट डाऊन ची ही अदृश्य भिंत पाडून प्रशासनाने खऱ्या अर्थाने स्पीड अप होण्याची हीच योग्य वेळ आहे! अपेक्षा एकच आहे की सर्वर डाऊन आहे साईट बंद आहे हे भूत लवकर उठावे व गोरगरीब कष्टकरी जनतेसाठी दिलासा मिळावा हीच अपेक्षा.....

डॉ.नामदेव गुंजाळ
संगमनेर, मो. ९८२२०६०६०४

संपादकीय...

डिजिटल महाराष्ट्र, पण ग्रामीण नागरिकांची दमछाक!

आज महाराष्ट्र डिजिटल प्रगतीच्या दिशेने वेगाने वाटचाल करीत आहे. सरकारी कार्यालयांपासून बँकिंग व्यवहारांपर्यंत, शिक्षणापासून आरोग्यसेवेपर्यंत आणि विविध शासकीय योजनांपासून प्रमाणपत्रांच्या अर्जांपर्यंत सर्वत्र डिजिटल व्यवस्थेचा वापर वाढत आहे. कागदपत्रांचा वापर कमी करणे, वेळेची बचत करणे, पारदर्शकता वाढविणे आणि सरकारी सेवा नागरिकांपर्यंत सहज पोहोचविणे हा डिजिटल व्यवस्थेचा मुख्य उद्देश आहे. मात्र, या प्रगतीच्या चित्राची दुसरी बाजूही तितकीच महत्त्वाची आहे. शहरांमध्ये डिजिटल सुविधा सहज उपलब्ध होत असताना ग्रामीण भागातील अनेक नागरिकांना याच सुविधांचा लाभ घेण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. त्यामुळे प्रश्न उपस्थित होतो की, महाराष्ट्र डिजिटल होत असताना ग्रामीण नागरिकांची ही दमछाक कधी थांबणार? डिजिटल सेवा ही काळाची गरज आहे, यात शंका नाही. सातबारा उतारा, रहिवासी दाखला, उत्पन्नाचा दाखला, विविध शासकीय योजनांचे अर्ज, शिष्यवृत्ती, पेन्शन आणि इतर अनेक कामांसाठी आता ऑनलाइन प्रक्रियेचा आधार घेतला जातो. पूर्वी सरकारी कार्यालयांमध्ये वारंवार चकरा माराव्या लागत असत. डिजिटल व्यवस्थेमुळे हा त्रास कमी होण्याची अपेक्षा होती. प्रत्यक्षात मात्र ऑनलाइन अर्ज कसा भरायचा, आवश्यक कागदपत्रे कशी जोडायची, संकेतस्थळावर नोंदणी कशी करायची आणि अर्जातील त्रुटी कशा दुरुस्त करायच्या, याची माहिती नसल्याने अनेक नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागतो. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, अल्पशिक्षित व्यक्ती, शेतकरी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी ही प्रक्रिया अधिक जिकिरीची ठरते. ग्रामीण भागातील डिजिटल अडचणींचे एक प्रमुख कारण म्हणजे इंटरनेटची उपलब्धता आणि त्याची गुणवत्ता. अनेक गावांमध्ये इंटरनेटचा वेग कमी असतो, तर काही ठिकाणी नेटवर्क वारंवार खंडित होते. ऑनलाइन अर्ज भरताना किंवा आवश्यक कागदपत्रे अपलोड करताना प्रक्रिया मध्येच थांबते. परिणामी, नागरिकांचा वेळ वाया जातो आणि पुन्हा सुरुवातीपासून अर्ज भरण्याची वेळ येते. एखाद्या शासकीय योजनेची अंतिम मुदत जवळ आली असेल, तर अशा तांत्रिक अडचणींचा आर्थिक आणि मानसिक त्रास अधिक वाढतो. डिजिटल सुविधा उपलब्ध असल्याचे कागदोपत्री दिसते; परंतु त्या प्रत्यक्षात सुरळीत चालतात का, याकडेही तितकेच गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. याशिवाय, डिजिटल साक्षरतेचा प्रश्न दुर्लक्षित करता येणार नाही. मोबाईल हाताळता येणे म्हणजे सर्व ऑनलाइन सेवा वापरता येणे नव्हे. इंग्रजीतील सूचना, गुंतागुंतीचे अर्ज, तांत्रिक शब्द आणि वारंवार बदलणारी संकेतस्थळे यांमुळे अनेक नागरिक गोंधळून जातात. स्मार्टफोन नसणे, मोबाईलमधील मर्यादित माहिती साठवण क्षमता, इंटरनेटसाठी लागणारा खर्च आणि आवश्यक कागदपत्रांची डिजिटल प्रत उपलब्ध नसणे, या समस्याही आहेत. ग्रामीण नागरिकांना प्रत्येक कामासाठी महा-ई-सेवा केंद्र किंवा खासगी संगणक केंद्राचा आधार घ्यावा लागतो. त्यासाठी प्रवासखर्च, अर्ज भरण्याचे शुल्क आणि इतर खर्च करावा लागतो. सरकारी सेवा ऑनलाइन झाल्या, तरी त्या मिळविण्यासाठी नागरिकांना अतिरिक्त पैसे मोजावे लागत असतील, तर डिजिटल सुविधांच्या उद्देशाचा पुनर्विचार करावा लागेल. शेतकऱ्यांच्या बाबतीत ही समस्या अधिक गंभीर आहे. पीकविमा, अनुदान, नुकसानभरपाई, ई-केवायसी, शेतकरी नोंदणी आणि विविध कृषी योजनांसाठी ऑनलाइन प्रक्रिया आवश्यक ठरत आहे. मात्र, अर्जातील छोटीशी चूक, आधार क्रमांकातील त्रुटी, बँक खात्याशी संबंधित अडचण किंवा तांत्रिक कारणामुळे अर्ज प्रलंबित राहू शकतो. अशा वेळी नेमकी चूक काय आहे आणि ती कुठे दुरुस्त करायची, याची स्पष्ट माहिती मिळणे आवश्यक असते. शेतीच्या कामातून वेळ काढून शासकीय सेवा केंद्रांमध्ये जाणाऱ्या शेतकऱ्याला वारंवार हेलपाटे मारावे लागत असतील, तर डिजिटल व्यवस्था त्याच्यासाठी सोयीची ठरण्याऐवजी अडथळा बनते. या समस्येवर उपाय शोधताना डिजिटल सेवांचा विस्तार करण्याबरोबरच त्यांचा वापर सुलभ करण्यावर भर दिला पाहिजे.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पात्र लाभार्थ्यांना वेळेत अन्नधान्य मिळणार

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- राज्यात जून ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत झालेली पर्जन्यमानातील तूट आणि त्यातून निर्माण झालेली दुष्काळसदृश परिस्थिती लक्षात घेऊन अहिल्यानगर जिल्ह्यातील पात्र शिधापत्रिकाधारकांना वेळेत अन्नधान्य मिळावे, यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे. अन्नधान्याची उपलब्धता, साठवणूक, उचल आणि रास्तभाव दुकानांमार्फत वितरण यांचे नियोजन करण्यात आले असून, एकही पात्र लाभार्थी अन्नधान्यापासून वंचित राहू नये, यासाठी पुरवठा यंत्रणा कार्यरत असल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बडे यांनी दिली. दुष्काळाच्या परिस्थितीत ग्रामीण भागातील नागरिकांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. पिण्याचे पाणी, पशुधनासाठी चारा आणि रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला असताना गरजू कुटुंबांना अन्नधान्याचा नियमित लाभ मिळणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील अन्नधान्याचे नियोजन आणि वितरण सुरळीत ठेवण्यावर प्रशासनाकडून भर देण्यात येत आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात अंत्योदय, केशरी व शुभ्र अशा एकूण १० लाख ६० हजार ८७२ शिधापत्रिका आहेत. यापैकी अंत्योदय व प्राधान्य कुटुंबांतील ६ लाख ८४ हजार ६५६ शिधापत्रिकाधारकांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत अन्नधान्याचा लाभ दिला जातो. शासनाने निश्चित केलेल्या नियमांनुसार पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्य उपलब्ध करून देण्यात येते. वितरण प्रक्रियेत कोणताही अडथळा निर्माण होऊ नये आणि लाभार्थ्यांना अनावश्यक त्रास सहन करावा लागू नये, यासाठी संबंधित यंत्रणेला दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. जिल्ह्यातील



तालुकानिहाय शासकीय गोदामांची एकूण साठवण क्षमता ३६ हजार ६० मेट्रिक टन आहे. ऑक्टोबर आणि नोव्हेंबर २०२६ या दोन महिन्यांसाठी आवश्यक असलेल्या अन्नधान्याच्या उचलीस मंजुरी देण्यात आली आहे. मंजूर अन्नधान्याची उचल वेळेत पूर्ण करून रास्तभाव दुकानांमार्फत पात्र लाभार्थ्यांना त्याचे वितरण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. उपलब्ध साठा, मंजूर नियतन आणि प्रत्यक्ष वितरण यांचा नियमित आढावा घेण्याच्या सूचनाही संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

अन्नधान्याची उचल पूर्ण झाल्यानंतर ते संबंधित रास्तभाव दुकानांपर्यंत पोहोचविणे आणि लाभार्थ्यांना नियमानुसार वितरण करणे आवश्यक आहे. यासाठी पुरवठा विभागाकडून वितरण प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यात येत आहे. अन्नधान्याचा साठा आणि वितरण यामध्ये समन्वय राखून लाभार्थ्यांना वेळेत धान्य मिळावे, यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा लाभ अधिकाधिक पात्र नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी नवीन लाभार्थ्यांची निवड शासनाने निर्धारित केलेल्या निकषांनुसार केली जाते. उपलब्ध माहितीनुसार, नवीन लाभार्थ्यांच्या निवडीसाठी शहरी भागात वार्षिक उत्पन्नाची मर्यादा ५९ हजार रुपये, तर ग्रामीण भागात ४४ हजार रुपये विचारात घेतले जातात. लाभार्थ्यांची पात्रता निश्चित करताना संबंधित शासन निर्णय, लागू नियम आणि आवश्यक कागदपत्रांची पडताळणी केली जाते. त्यामुळे पात्र नागरिकांनी अर्ज करताना आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणे गरजेचे आहे. शासनाच्या दुष्काळ निवारणासाठीच्या उपाययोजना, अन्नधान्य वितरणाची स्थिती आणि सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत उपलब्ध सुविधांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे काम पुरवठा निरीक्षण अधिकारी आणि पुरवठा निरीक्षक यांच्यामार्फत करण्यात येत आहे. ८ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगानेही आवश्यक कार्यवाही करण्यात येत असून, पात्र लाभार्थ्यांना नियमानुसार लाभ मिळावा यासाठी संबंधित विभागांमध्ये समन्वय राखण्यात येत आहे.

केंद्र शासनाच्या 'वन नेशन, वन रेशन कार्ड' योजनेअंतर्गत पात्र शिधापत्रिकाधारकांना अन्नधान्य मिळविण्यासाठी पोर्टेबिलिटीची सुविधा उपलब्ध आहे. रोजगार, व्यवसाय किंवा अन्य कारणांमुळे एखादा लाभार्थी दुसऱ्या तालुक्यात, जिल्ह्यात अथवा राज्यात स्थलांतरित झाला, तरी योजनेच्या लागू नियमांनुसार आणि उपलब्ध पात्रतेनुसार संलग्न रास्तभाव दुकानातून अन्नधान्याचा लाभ घेता येतो. या सुविधेमुळे स्थलांतरित कामगार आणि इतर पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्य मिळविण्यासाठी केवळ मूळ गावातील रास्तभाव दुकानावर अवलंबून राहावे लागत नाही. स्थलांतरित ठिकाणीही सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा लाभ घेणे सुलभ झाले आहे.

ग्रामपंचायत गव्हाणेवाडी, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर ब –१ निविदा नोटीस

प्रशासक/ ग्रामपंचायत अधिकारी ग्रा.पं. गव्हाणेवाडी, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर यांचेकडून खालील कामांचे जिल्हा परिषद अहिल्यानगर सा. बा. विभाग यांचे कडील नोंदणीकृत सीलबंद ब १ दोन किंत्राटदाराकडून लफाफा पद्धतीने ब १ निविदा मागविण्यात येत आहे.

अ. क्रं.	कामाचे नाव	योजना	निविदा रक्कम	निविदा फॉर्म फी	बयाणा रक्कम	ठेकेदार वर्गवारी	कामाची मुदत
१.	मौजे गव्हाणेवाडी येथे सोनलकरवस्ती येथे सिमेंट कॉंक्रीट रस्ता करणे	वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजना	७८६५००/-	५९०/-	--	सु.बे.	६ महिने

निविदा फॉर्म व कामाच्या शर्ती व अटीबाबत ची माहिती ग्रामपंचायत गव्हाणेवाडी कार्यालयात दि. १४/१०/२०२६ ते दि. २१/१०/२०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत (सुट्टीचा दिवस सोडून) मिळतील. सीलबंद निविदा दि २१/१०/२०२६ पर्यंत रोजी सकाळी ठीक १०.०० वाजेपर्यंत स्वीकारणेत येतील. त्याबाबत अटि शर्ती बाबत माहिती ग्रा पं. गव्हाणेवाडी येथे उपलब्ध आहे. निविदा स्वीकारण्याच्या अगर नाकारण्याचा अधिकार सरपंच/ ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत गव्हाणेवाडी यांनी राखून ठेवला आहे. निविदा उघडण्याची प्रक्रिया दि. २२/१०/२०२६ रोजी दुपारी ठीक ०३.०० वाजता ग्रामपंचायत निंबवी, ता. श्रीगोंदा, जि-अ.नगर येथे पार पडेल निविदा फॉर्म सोबत १) नोंदणी प्रमाणपत्र २) जिएसटी नंबर ३) पॅनकार्ड ४) आयकर विवरण ५) ब१ निविदा फॉर्म ६) बंधपत्र व आवश्यक कागदपत्रे जोडावीत.

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रा.पं. गव्हाणेवाडी, ता. श्रीगोंदा, जि. अ.नगर

प्रशासक
ग्रा.पं. गव्हाणेवाडी, ता. श्रीगोंदा, जि. अ.नगर

ग्रामपंचायत देसवडे, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर ब –१ निविदा नोटीस

प्रशासक/ ग्रामपंचायत अधिकारी ग्रा.पं. दसवडे, ता. पारनेर जि.अहिल्यानगर यांचेकडून खालील कामांचे जिल्हा परिषद अहिल्यानगर सा. बा. विभाग यांचे कडील नोंदणीकृत सीलबंद ब १ दोन किंत्राटदाराकडून लफाफा पद्धतीने ब १ निविदा मागविण्यात येत आहे.

अ. क्रं.	कामाचे नाव	योजना	निविदा विक्री	बयाणा रक्कम	निविदा रक्कम	कामाची मुदत	वर्गवारी
१.	मौजे देसवडे येथे खाडेवस्ती क्र.०३ येथे क्राँक्रीट रस्ता करणे.	अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे २०२५-२६	२३६/-	१%	१५७६३६/-	६ महिने	खुला
२.	मौजे देसवडे येथे खाडेवस्ती क्र.०३ येथे पाणीपुरवठा पाणी टाकी बांधकाम करणे	अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे २०२५-२६	२३६/-	--	१६९३२१/-	६ महिने	सु. बे.
३.	मौजे देसवडे येथे खाडेवस्ती क्र.०२ येथे समाजमंदिर बांधकाम करणे	अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे २०२५-२६	५९०/-	--	५८११८१/-	६ महिने	सु. बे.
४.	मौजे देसवडे येथे खाडेवस्ती क्र.०२ येथे पोहोच रस्ता करणे	अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे २०२५-२६	२३६/-	--	७९७६८/-	६ महिने	म.स.स.

कामाच्या शर्ती व अटीबाबतची माहिती ग्रामपंचायत **देसवडे** कार्यालयात **दि. १५/१०/२०२६ ते दि. २१/१०/२०२६** या कालावधीत कार्यालयीन वेळेत सीलबंद निविदा **दि. २१/१०/२०२६** रोजी संध्याकाळी ठीक ०६.०० वाजेपर्यंत स्वीकारणेत येतील. त्याबाबत अटी शर्ती बाबत माहिती ग्रा. पं. **देसवडे** येथे उपलब्ध आहे. दरपत्रक स्वीकारण्याचा अगर नाकारण्याचा अधिकार सरपंच/ग्रामपंचायत अधिकारी **देसवडे** यांनी राखून ठेवला आहे. निविदा उघडण्याची प्रक्रिया **दि. २२/१०/२०२६** रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता ग्रामपंचायत **देसवडे** ता. पारनेर जि. अ.नगर येथे पार पडेल. निविदा फॉर्म सोबत १) नोंदणी प्रमाणपत्र २) जीएसटी नंबर ३) पॅनकार्ड ४) आयकर विवरण ५) ब १ निविदा फॉर्म ६) बंधपत्र १०० स्टॅम्प पेपर वर ७) कामाचे अनुभव दाखले (सु. बे. साठी सुरूवातीचे ३ वर्षापर्यंत कामाचे अनुभव दाखले साठी सुट राहील. नवीन नोंदणी असले बाबतचे प्रतिज्ञापत्र १०० च्या स्टॅम्प पेपर वर जोडणे आवश्यक राहील) ८) बयाणा रक्कम (सुबेसाठी प्रमाणपत्रावर सुटचा उल्लेख असणे गरजेचे आहे) व निविदा फी भरलेली पावती (सामान्य पावती) व आवश्यक कागदपत्रे जोडावीत.

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रा.पं. देसवडे, ता. पारनेर, जि. अ.नगर

प्रशासक
ग्रा.पं. देसवडे, ता. पारनेर, जि. अ.नगर

ग्रामपंचायत जवळा, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर ब –१ निविदा नोटीस

प्रशासक/ ग्रामपंचायत अधिकारी ग्रा.पं. जवळा, ता. पारनेर जि.अहिल्यानगर यांचेकडून खालील कामांचे जिल्हा परिषद अहिल्यानगर सा. बा. विभाग यांचे कडील नोंदणीकृत सीलबंद ब १ दोन किंत्राटदाराकडून लफाफा पद्धतीने ब १ निविदा मागविण्यात येत आहे.

अ. क्रं.	कामाचे नाव	योजना	निविदा विक्री	बयाणा रक्कम	निविदा रक्कम	कामाची मुदत	वर्गवारी
१.	मौजे जवळा येथे गावांतर्गत अर्ध सैनिक कॅन्टीन ते जवळे गाडीलकर चौफुली रस्ता करणे	नागरी सविधांसाठी विशेष अनुदान योजना सन २०२५-२६	५९०/-	१%	७२५३८७/-	६ महिने	खुला

कामाच्या शर्ती व अटीबाबतची माहिती ग्रामपंचायत **जवळा** कार्यालयात **दि. १५/१०/२०२६ ते दि. २१/१०/२०२६** या कालावधीत कार्यालयीन वेळेत सीलबंद निविदा **दि. २१/१०/२०२६** रोजी संध्याकाळी ठीक ०६.०० वाजेपर्यंत स्वीकारणेत येतील. त्याबाबत अटी शर्ती बाबत माहिती ग्रा. पं. **जवळा** येथे उपलब्ध आहे. दरपत्रक स्वीकारण्याचा अगर नाकारण्याचा अधिकार सरपंच/ग्रामपंचायत अधिकारी **जवळा** यांनी राखून ठेवला आहे. निविदा उघडण्याची प्रक्रिया **दि. २२/१०/२०२६** रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता ग्रामपंचायत **जवळा** ता. पारनेर जि. अ.नगर येथे पार पडेल. निविदा फॉर्म सोबत १) नोंदणी प्रमाणपत्र २) जीएसटी नंबर ३) पॅनकार्ड ४) आयकर विवरण ५) ब १ निविदा फॉर्म ६) बंधपत्र १०० स्टॅम्प पेपर वर ७) कामाचे अनुभव दाखले (सु. बे. साठी सुरूवातीचे ३ वर्षापर्यंत कामाचे अनुभव दाखले साठी सुट राहील. नवीन नोंदणी असले बाबतचे प्रतिज्ञापत्र १०० च्या स्टॅम्प पेपर वर जोडणे आवश्यक राहील) ८) बयाणा रक्कम (सुबेसाठी प्रमाणपत्रावर सुटचा उल्लेख असणे गरजेचे आहे) व निविदा फी भरलेली पावती (सामान्य पावती) व आवश्यक कागदपत्रे जोडावीत.

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रा.पं. जवळा, ता. पारनेर, जि. अ.नगर

प्रशासक
ग्रा.पं. जवळा, ता. पारनेर, जि. अ.नगर

दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता
०२४२५ २२५१२९

भाड्याने देणे आहे
टॉप टेन इम्पेरिअल (रिलायन्स डिजीटल) मध्ये ग्राउंड फ्लोअरचे दोन शॉप किंवा ऑफिस भाड्याने देणे आहे
- संपर्क -
9730380303
9552690909

पाहिजेत
अकाऊंटंट - 2 जागा
कॅशिअर - 2 जागा
सेल्समन - १० जागा (पु.)
सेल्समन - १० जागा (म.)
वॉचमन - २ जागा
आकर्षक पगार दिले जाईल
मुळचंद कापड दुकान
सेलिब्रेश हॉटेल समोर, संगमनेर
9923682801

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
RUSHIKESH RAJENDRA GADGE
TO NEW NAME
RUSHIKESH RAJENDRA GADAGE
BY AFFIDAVIT NO 1268/2026 DATE 08/10/2026
ADD-MARATHI SHALE MAGE, WADGAON PAN,TAL.SANGAMNER, AHILAYANAGAR,422605

शेतकरी उत्पादक कंपनीमध्ये रोजगाराची संधी!
भरती सुरू आहे
पदाचे नाव:-फिल्ड कॉर्डिनेटर - २
कृषी क्षेत्रात काम करण्याची संवर्णसंधी!
कामाचे स्वरुप:-
शेतकऱ्यांबरोबर समन्वय साधणे,शेतकऱ्यांच्या शेतीविषयक मार्गदर्शन व समन्वय,शेतकरी गट/ सभासदांशी नियमित संपर्क ठेवणे, कंपनीच्या कृषीविषयक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करणे
शैक्षणिक पात्रता
पदवीधर/कृषी पदविका/तत्सम शैक्षणिक पात्रता शेती विषयक कामाचा अनुभव असणे गरजेचे
वयोमर्यादा, २५ ते ३५ वर्षे कार्यस्थळ,संगमनेर तालुका
ईच्छुक उमद्वारांनी बायोडाटा पुढील नंबरवर दि. १८/११/२०२६ व्हॉटसॲप किंवा इमेलवर पाठवावा. संपर्क:9850119046
Email:ens.krishivikasfpc@gmail.com
कृषी क्षेत्रात काम करण्याची आवड आणि शेतकऱ्यांसोबत काम करण्याची क्षमता असलेल्या उमेदवारांनी आजच अर्ज करावा!

पाहिजेत
रिसेप्शनिस्ट- १
(स्त्री / पुरूष)
शिक्षणास प्राधान्य
कॉम्प्युटर ज्ञान,
- संपर्क -
8378956909
8459199913
बायोडाटा पाठवा

पाहिजेत
ध्येय फायनान्स संगमनेर
Branch manager BM-1
Branch devlopment Menegar BDM- 1
Sales devlopment MenegarSDM - 1
Telicaller - 2 M/F
कार्यालय - युवा ध्येय, विठ्ठल स्मृती कॉम्प्लेक्स, अकोले रोड, संगमनेर
फोन (०२४२५)२६१८७२
9370773504
7768079272

पाहिजेत
ड्रायव्हर कम हेल्पर पाहिजे
आत्मशांती टी सेंटर
(सपट चहा)
नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

पाहिजेत
सेल्समन - ४ जागा
अकाऊंटंट - १ जागा
मॅनेजर - १ जागा
(अनुभवास प्राधान्य)
आकर्षक पगार दिले जाईल
मैड सराफ ॲण्ड सन्स
नेहरूचौक, संगमनेर
9850530266

पाहिजेत
डिप्लोमा सिव्हिल इंजिनिअर - 2 जागा
स्वतःची टू व्हीलर लायसन्स आवश्यक
B & K Construction
7758009532
7028456005

Urgently Required
Office Manager
Sangamner (1 Post)
Valuation Report Typist, Property Visit.
Office Management.
Contact-
9421911671

पाहिजेत
कॉम्प्युटर ऑपरेटर - ४
अकाऊंटंट - २
सेल्समन - ५
(इन्सेंटीव्ह दिला जाईल)
आकर्षक पगार दिले जाईल
9822097904
9404971697
भेटण्याची वेळ (सायं ४ ते ७)

जागा भरणे आहे
ऑफिस बॉय
ऑफिस क्लार्क
महिला किंवा पुरूष
इलेक्ट्रॉनिक मशिनरी चालविणेचा अनुभव असलेला कारागीर
वॉचमेन
अनुभवास प्राधान्य
- संपर्क -
9822334431

SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
Shaikh Rashida Amir
NEW NAME AS
Shahista Sajid Shaikh
Address:- Naikwadpura Jama Masjid Jawal Sangamner 422605 Dist- Ahilyanagar





श्रद्धेय भाऊ उर्फ विश्वनाथजी कलंत्री : माणसे जोडणारे, आनंदाची पेरणी करणारे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व...

आनंदयात्रेची पूर्णाहुती !



संगमनेर : काही माणसे आपल्या सहवासातून आयुष्यभर पुरेल इतका आनंद, प्रेम आणि आपुलकी देऊन जातात. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी सहज भरून निघत नाही. श्रद्धेय भाऊ उर्फ विश्वनाथजी कलंत्री हे असेच एक आनंदयात्री होते. त्यांच्या निधनाने संगमनेरच्या सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनातील एक प्रेमळ व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे.

भाऊंना भेटले की मनात नेहमी एक प्रश्न निर्माण व्हायचा-'आपल्यालाही इतके आनंदी आणि समाधानी जीवन जगता येईल का?' प्रसन्न चेहरा, प्रत्येकाशी आपुलकीने संवाद साधण्याची पद्धत, दुसऱ्याच्या सुख-दुःखात सहभागी होण्याची वृत्ती आणि सर्वांना भरभरून आशीर्वाद देण्याचा स्वभाव, ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये होती. भगवद्गीतेतील 'अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च' या वचनाचा आशय त्यांच्या आचरणातून अनुभवायला मिळत असे. द्वेषापेक्षा मैत्री, अहंकारापेक्षा नम्रता आणि स्वतःच्या आनंदासोबत इतरांच्या आनंदालाही महत्त्व देणे, हाच त्यांच्या जीवनाचा मूलमंत्र होता.

कष्टातून उभा राहिलेला जीवनप्रवास

गुळेदगुड, कर्नाटक ते संगमनेर हा भाऊंचा प्रवास मेहनत, जिद्द आणि व्यावसायिक शिस्तीचा होता. संगमनेरला परतल्यानंतर त्यांनी कापड व्यवसाय सुरू केला. धाकटे बंधू स्व. राजगोपालजी अर्थात भाया यांच्या साथीने उभे केलेले 'श्री रामबिलास चुनीलाल कलंत्री' हे कापड दुकान आजही अनेकांच्या स्मरणात आहे. खेड्यापाड्यांत सायकलवरून जाऊन माल विकण्यापासून सुरू झालेला त्यांचा प्रवास त्यांच्या कष्टाळू वृत्तीची साक्ष देतो. विनोदी स्वभाव, स्पष्टवक्तेपणा आणि वेळेचे काटेकोर पालन यांमुळे त्यांनी व्यवसायासोबतच माणसांचीही संपत्ती कमावली. व्यवहारात विश्वास आणि नात्यांत आपुलकी जपणे, ही त्यांच्या यशाची खरी शिदोरी होती.

माहेश्वरी समाजाचा आधारस्तंभ

संगमनेर माहेश्वरी समाजाचे सरपंच म्हणून भाऊंनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. कुंकू समारंभ, उठावणा, विवाह किंवा अन्य सामाजिक कार्यक्रम असो, प्रत्येक ठिकाणी त्यांची उपस्थिती आधार देणारी असायची. अनेकांचे विवाह जुळविण्यात त्यांनी पुढाकार घेतला. धार्मिक परंपरांचे जतन, सामाजिक समरसता आणि गरजूंना निःस्वार्थ मदत, यांना त्यांनी नेहमीच महत्त्व दिले. सरपंचपदाच्या कार्यकाळात त्यांनी समाजासाठी नियमावली आणि काळानुरूप सुधारणांचा आग्रह धरला. त्यांनी रुजविलेल्या अनेक पद्धतींचे समाजात आजही पालन केले जाते. परंपरेविषयी आदर बाळगतानाच आवश्यक बदल स्वीकारण्याची त्यांची भूमिका होती.

महेश ज्येष्ठ नागरिक संघाच्या उपक्रमांतही त्यांचा उत्साही सहभाग असायचा. कार्यक्रमांना उपस्थित राहून तन, मन आणि धनाने सहकार्य करण्याची त्यांची वृत्ती सर्वांना प्रेरणा देणारी होती.

भावपूर्ण श्रध्दांजली



गंगामाईशी अतूट नाते

गंगामाईशी भाऊंचे अतूट नाते होते. अनेक वर्षे त्यांनी गंगामाई मंदिराचे विश्वस्त म्हणून सेवा केली. जुन्या विश्वस्त मंडळातील हयात असलेले ते शेवटचे सदस्य होते. मंदिरात येणाऱ्या साधू-संतांना दररोज एका वेळचे भोजन देण्याचा सेवाक्रम त्यांनी वर्षानुवर्षे जपला. पहाटेची प्रार्थना, नियमित पूजा, नैवेद्य, सकाळ-संध्याकाळचा फेरफटका आणि भजन-कीर्तनातील सहभाग, हा त्यांचा नित्यक्रम होता. सुमारे साठ ते पासष्ट वर्षे ते नियमितपणे गंगामाईच्या दर्शनाला जात होते. ही सातत्यपूर्ण साधना त्यांच्या श्रद्धेची आणि शिस्तीची साक्ष होती.

भेटणाऱ्या प्रत्येकाची आस्थेने विचारपूस करणे आणि विवाहप्रसंगी मंगलाष्टकातील कडवे म्हणून वधू-वरांना आशीर्वाद देणे, यातून त्यांचा प्रेमळ स्वभाव अनुभवायला मिळत असे. 'जय विठ्ठल', 'जय श्रीराम', 'जय श्रीकृष्ण' आणि 'जय गंगा मैया' या जयघोषांतून ते लोकांशी संवाद साधत. त्यांच्या आवाजातील उत्साह आणि आपुलकी आजही अनेकांच्या स्मरणात आहे.

मैत्रीतील जिव्हाळा आणि निष्ठा

डॉ. झंवर, सोमनाथ काका लाहोटी, रामूशेठ काका सोमाणी, द्वारकानाथ काका बंग, स्व. जगन्नाथ कलंत्री, स्व. जगन्नाथ तापडे आणि स्व. बद्रिनारायण मनियार यांच्यासोबतची त्यांची मैत्री विशेष उल्लेखनीय होती. दररोज गंगामाई परिसरात फेरफटका, राजकारणावरील रंगतदार चर्चा आणि कोजागिरीच्या रात्री रंगणाऱ्या मैफिली, हा त्यांच्या जीवनातील आनंदाचा ठेवा होता.

डॉ. झंवर यांना अपघातात दुखापत झाल्यानंतर भाऊंनी त्यांची मनापासून काळजी घेतली. रुग्णालयातून घरी आल्यानंतर त्यांना स्वतःच्या हाताने जेवण भरविले. अशा प्रसंगांतून त्यांच्या मैत्रीतील जिव्हाळा, निष्ठा आणि सेवाभाव दिसून येतो. त्यांच्यासाठी मैत्री म्हणजे केवळ गप्पांचा सहवास नव्हता; अडचणीच्या काळात मित्राच्या पाठीशी उभे राहणेही तितकेच महत्त्वाचे होते.

संकटांवर मात करणारी इच्छाशक्ती

जीवनात गंभीर अपघात आणि मोठ्या शस्त्रक्रियांचे अनेक प्रसंग आले. तीन-चार वेळा मृत्यूच्या दारातून परत येऊनही भाऊ डगमगले नाहीत. इच्छाशक्ती आणि सकारात्मक दृष्टिकोनाच्या बळावर त्यांनी संकटांवर मात केली. आयुष्याच्या उत्तरार्धात आजारपणाचा सामना करतानाही त्यांनी मनातील उमेद जपली. शक्य असेपर्यंत स्वतःची कामे स्वतः करणे आणि समाजातील लोकांच्या सुख-दुःखात सहभागी होणे, ही त्यांची वृत्ती कायम राहिली. अनेकांचे वाढदिवस त्यांच्या लक्षात असत. पहाटे सहा वाजता फोन करून कविता किंवा शेरोशायरीतून शुभेच्छा देण्याची त्यांची खास पद्धत होती. त्या शुभेच्छांमध्ये औपचारिकतेपेक्षा प्रेम आणि आशीर्वाद अधिक असत. आता ते फोन येणार नाहीत; गंगामाईच्या काठावर त्यांची प्रसन्न उपस्थिती दिसणार नाही. मात्र त्यांच्या गप्पा, भजनातील स्वर आणि आशीर्वाद मनात कायम राहतील.

संस्कारांचा वारसा जपणारा परिवार

भाऊंच्या पश्चात पत्नी अयोध्याबाई, दोन मुलगे, तीन मुली, सुना, नातवंडे आणि नातसुना असा भरलेला परिवार आहे. पत्नी अयोध्याबाई यांनी गृहिणी म्हणून घर आणि कुटुंबाची जबाबदारी सांभाळली.

त्यांचे पुत्र प्रकाश कलंत्री हे संगमनेर शहरातील विविध संघटनांमध्ये पदाधिकारी म्हणून कार्यरत राहून समाजसेवेत पुढाकार घेतात. विशेषतः विविध समाजांतील कुटुंबांवर दुःखाचा प्रसंग ओढवल्यास अंत्यविधीच्या वेळी त्यांच्या पाठीशी उभे राहणे, आवश्यक व्यवस्था करणे आणि आधार देणे, हा त्यांचा गुण वाखाणण्याजोगा आहे. या सेवाभावाची प्रेरणा त्यांना वडिलांकडूनच मिळाली आहे.

धाकटे पुत्र कापड व्यवसायात कार्यरत आहेत. तिन्ही मुली आपापल्या कुटुंबांत सुखाने नांदत आहेत. दोन्ही नातू उच्चशिक्षित असून, त्यांपैकी एक अमेरिकेत कार्यरत आहे, तर दुसरा कापड व्यवसायात आहे. नात तन्वी उच्च शिक्षण घेत आहे. पुढील पिढीची प्रगती आणि कुटुंबातील एकोपा हा भाऊंच्या आनंदाचा विषय होता. त्यांचे पुतणे शैलेश कलंत्री हे माजी उपनगराध्यक्ष आणि विद्यमान नगरसेवक आहेत. चुलत बंधू श्री. कैलास सोमनाथ कलंत्री यांनीही माहेश्वरी समाजाचे तालुका अध्यक्ष म्हणून कार्य केले आहे. संपूर्ण परिवाराला सोबत घेऊन चालण्याची आणि नात्यांतील आपुलकी जपण्याची कला या दोन्ही बंधूंमध्ये होती.

समाजाच्या मनात जपलेली आपुलकी

भाऊंच्या निधनाचे वृत्त समजताच लोकनेते बाळासाहेबजी थोरात, माजी आमदार डॉ. सुधीरजी तांबे, माजी नगराध्यक्ष सौ. दुर्गाताई तांबे, डॉ. संजय मालपाणी, माहेश्वरी समाजाचे कार्याध्यक्ष गिरीश मालपाणी यांच्यासह शहरातील व्यापारी, नातेवाईक आणि मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित झाला. अनेकांनी श्रद्धांजलीपर मनोगते आणि लेख परिवाराकडे पाठवून त्यांच्या आठवणींना उजाळा दिला. भाऊंनी आयुष्यभर जोडलेल्या माणसांच्या मनात त्यांच्याविषयी किती प्रेम आणि आदर होता, याची ही साक्ष होती. भाऊंचे जीवन म्हणजे माणुसकी, मैत्री, श्रद्धा, शिस्त आणि आनंद यांचा सुंदर संगम होता. त्यांनी स्वतः आनंदाने जगण्याबरोबरच इतरांच्या जीवनातही आनंदाची पेरणी केली. त्यांची आनंदयात्रा पूर्ण झाली असली, तरी त्यांनी जोडलेली मने, दिलेले संस्कार आणि निर्माण केलेल्या आठवणी कायम जिवंत राहतील.

परमेश्वर त्यांच्या पवित्र आत्म्यास चिरशांती देवो आणि कलंत्री परिवारासह सर्व स्नेहीजनांना हे दुःख सहन करण्याचे बळ देवो, हीच गंगामाईच्या चरणी प्रार्थना.

श्रद्धेय भाऊ उर्फ विश्वनाथजी कलंत्री यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन!

भावपूर्ण श्रद्धांजली!

॥ शान्तिः ॥

जय गंगा मैया! जय विठ्ठल!

प्रा. ओंकार बिहाणी, संगमनेर

संगमनेर तालुक्याचा संभाव्य टंचाई कृती आराखडा जिल्हाधिकाऱ्यांना सादर

दुष्काळात ४६ गावे १६७ वाड्यांना ३९ टँकरचा प्रस्ताव, पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा, रोजगाराचा प्रश्नही गंभीर

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यात दुष्काळी परिस्थितीमुळे सध्या ऑक्टोबर महिन्यात आठ गावे व १६ वाड्यांना आठ टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. दुष्काळातील आगामी पाणी टंचाई लक्षात घेता पंचायत समितीने संभाव्य कृती टंचाई आराखडा तयार केला आहे.

शासनाने संगमनेर तालुका दुष्काळी जाहीर केल्याने दुष्काळाची दाहक्ता पाहता संगमनेर तालुक्यात ४६ गावे व १६७ वाढांना ३९ टँकरने पाणीपुरवठा करावा लागू शकतो असा टंचाई निवारणार्थ कृती आराखडा जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात आला असल्याची माहिती गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे यांनी दिली. दुष्काळाची तीव्रता वाढल्यास पुढील वर्षी २०२७ मध्ये जानेवारी फेब्रुवारी महिन्यात टँकरच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. संगमनेर तालुक्यात यंदा सरासरी पेक्षा खूपच कमी पाऊस झाला असुन पावसाची टक्केवारी ७८ टक्के इतकी आहे. यामुळे शेतातील पिके जळाली असून जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. सध्या तालुक्यात पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा, जनावरांच्या पिण्याचे पाणी व रोजगाराच्या प्रश्नाने गंभीर स्वरूप धारण केले आहे. एप्रिल महिन्यात संगमनेर तालुक्यात टँकर सुरू करण्यात आले असून सध्याही आठ गावे १६ वाड्यांना आठ टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. वरवंडी, खांबे, कौठे मलकापूर, हिवरगाव पठार, कुंभारवाडी, खरशिंदे, बिरेवाडी, जांभुळवाडी या गावांचा व गावांतर्गत येणाऱ्या १६ वाड्यांचा यात समावेश आहे. शासनाने तालुका दुष्काळी जाहीर केल्याने पाणीटंचाई निवारणार्थ प्रतिबंधक उपाययोजना कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. ऑक्टोबर ते डिसेंबर २०२६, जानेवारी ते मार्च २०२७, एप्रिल ते जुन असे तीन टप्पे तयार आले आहे. प्रत्येक टप्प्यात टँकरने पाणीपुरवठा करण्याची संख्या वेगवेगळी राहणार आहे.

संगमनेर तालुक्यात १४४ ग्रामपंचायत असुन ५० ग्रामपंचायतीने टँकर सुरू करण्यासंदर्भात ठराव घेतले आहे. नोव्हेंबर डिसेंबर महिन्यात टँकरची संख्या वाढवू शकते. तर पुढील वर्षी जानेवारी फेब्रुवारी महिन्यात दुष्काळाची वाढती तीव्रता पाहता ६१ गावे १८२ वाड्यांना ३९ टँकरने पाणीपुरवठा करावा लागु शकतो. संभाव्य पाणी टंचाई लक्षात घेता पंचायत समितीच्या वतीने विविध उपाययोजना राबविण्यात येत आहे. सार्वजनिक विहिरी अधिग्रहण करणे, नळ योजना पुर्ण करणे, दुरूस्ती करणे या सारख्या उपाययोजना करत आहे. दरवर्षी टंचाई काळात पाणीपुरवठा करावी लागणारी गावे व वाड्या वस्त्यांबरोबरच दुष्काळाच्या काळात नवीन गावे वाड्यांना यंदा पाणीपुरवठा करण्याची वेळ आली आहे. यामुळे ही संख्या ६२ गावे २०० वाड्या ३९ टँकर इतकी वाढू शकते. यात पठार भागातील गावांची संख्या सर्वाधिक असून दुष्काळाच्या झळाही अधिक जाणवू लागल्या आहे. पिण्याच्या पाण्याबरोबर जनावरांच्या पिण्याचा पाण्याचा प्रश्नही शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा आहे. यामुळे आगामी काळात जनावरांचा चारापाणी व रोजगाराच्याा प्रश्नावर शासनाला प्रयत्न करावे लागणार आहे.

ग्रामीण भागात दुष्काळामुळे शेतकऱ्यांबरोबर सर्वसामान्य नागरिकांनाही दुष्काळाचा सामना करावा लागत आहे. यामुळे रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी शासनाला उपाययोजना कराव्या लागत आहे. पंचायत समिती बरोबरच कृषी विभाग, महसूल विभाग व ग्रामपंचायतींना दुष्काळाच्या काळात अधिक सतर्क राहावे लागणार आहे.

ग्रामपंचायत सारोळा आडवाई, ब -१ दरपत्रक नोटीस

प्रशासक/ग्रामपंचायत ग्रा.पं. सारोळा आडवाई, ता. पारनेर जि. अहिल्यानगर यांचे कडून मौजे कोहकडी येथे पवारवाडी येथे शाळा खोली बांधकाम करणे कामी लागणाऱ्या मालाचे नोंदणीकृत कंत्राटदारांकडून / पुरवठादारांकडून सीलबंद दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

अ. क्रं.	साहित्याचे नाव	अंदाजे लागणारे प्रमाण	ब्रास/नग/किलो/दर
१	JCB	१ तास	18
२	Rubble Soling	१ ब्रास	18
३	Cement	१ नग	262
४	20mm metel Aggregate	१ ब्रास	25
५	Crush Sand	१ ब्रास	18
६	Steel	१ किलो	1.658
७	Bricks	१ नग	13000
८	Murum	१ ब्रास	25
९	Polished Shahabad	१ ब्रास	50.70
१०	Door Fream	१ नंबर	1
११	Steel Window	१ नग	5
१२	Door Fream	१ नग	1
१३	Color	१ किलो	1.00
१४	Labour Rate	दर	1
१५	Name Board	१ ब्रास	1.00

दरपत्रकव कामाच्या शर्ती ४ अटीबीबतची माहिती ग्रामपंचायत सारोळा आडवाई कार्यालयात दि. १५/१०/२०२६ ते दि. २१/१०/२०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत (सुट्टीचा दिवस सोडून) मिळतील, सीलबंद दरपत्रक दि २१/१०/२०२६ पर्यंत रोजी सायंकाळी चोक ०५.०० वाजेपर्यंत स्वीकारणेत येतील, त्याबाबत अटि शर्ती बाबत माहिती ग्रा.प. सारोळा आडवाई येथे उपलब्ध आहे, दरपत्रक स्वीकारण्याच्या अगर नाकारण्याचा अधिकार सरपंच: ग्रामसेवक ग्रामपंचायत सारोळा आडवाई यांनी राखून ठेवला आहे. दरपत्रक उघडण्याची प्रक्रिया दि. २२/१०/२०२६ रोजी सकाळी तीक १०.३० वाजता ग्रामपंचायत कोहकडी ता. पारनेर जि.अ.नगर येथे पार पडेल. दरपत्रक फॉम सोबत १) नोंदणी प्रमाणपत्र २) जिएसटी नंबर ३) पॅनकार्ड ४) आयकर विवरण ५) ब १ दरपत्रक फॉर्म व आवश्यक कागदपत्रे जोडावीत.

ग्रामसेवक
ग्रामपंचायत सारोळा आडवाई, ता. पारनेर, जि. अ.नगर

प्रशासक
ग्रामपंचायत सारोळा आडवाई ता. पारनेर, जि. अ.नगर



'ब्रिक्स'च्या आंतरराष्ट्रीय मंचावर संगमनेरी योगवैभव !

अहमदाबादेत घडवले योगपरंपरेचे दर्शन; ध्रुव ग्लोबलच्या दहा जणांचा सहभाग

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - भारतीय संस्कृतीचा प्राचीन वारसा, शारीरिक चापल्य, मानसिक एकाग्रता आणि देहबोलीतून साकारणार्या कलात्मकतेचा वैश्विक आविष्कार घडविणार्या 'ब्रिक्स पारंपरिक व स्वदेशी खेळांच्या आंतरराष्ट्रीय महोत्सवात' संगमनेरच्या ध्रुव ग्लोबल स्कूलने अभिमानास्पद ठसा उमटविला. अहमदाबाद येथे पार पडलेल्या या आंतरराष्ट्रीय सोहळ्यात भारताच्या योगासन प्रात्यक्षिकांसाठी महाराष्ट्राच्या १५ खेळाडूंच्या पथकाची निवड करण्यात आली होती. त्यामध्ये संगमनेरच्या ध्रुव ग्लोबल स्कूलमधील आठ विद्यार्थ्यांसह पुण्यातील ध्रुवच्या विद्यार्थिनीचा आणि याच शाळेच्या एका माजी विद्यार्थिनीचाही समावेश होता. त्यामुळे जागतिक व्यासपीठावर भारतीय योगपरंपरेचे दर्शन घडविण्याबरोबरच संगमनेरच्या शैक्षणिक आणि क्रीडाक्षेत्रातील गुणवत्तेनेही आंतरराष्ट्रीय स्तरावर मोहोर उमटवली आहे.

भारताच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय युवा व्यवहार व क्रीडा मंत्रालय आणि गुजरात सरकारच्या संयुक्त विद्यमाने अहमदाबादमधील वीर सावरकर क्रीडा संकुलात या महोत्सवाचे करण्यात आले होते. पारंपरिक खेळांचे जतन, विविध देशांच्या सांस्कृतिक वारशाचे संवर्धन, परस्पर सामंजस्य आणि आंतरराष्ट्रीय मैत्री वृद्धिंगत करणे, हा या उपक्रमाचा मूलभूत उद्देश होता. या स्पर्धेचे स्वरुप पदकांसाठीच्या चुरशीपेक्षा पारंपरिक खेळांचे प्रात्यक्षिक, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि ज्ञानाचे आदानप्रदान यावर केंद्रित होते. जवळपास १६० सहभागी खेळाडू आणि 'ब्रिक्स'च्या दहा सदस्य देशांच्या प्रतिनिधींनी या सोहळ्यात सहभाग घेतला होता.

योग ही भारताची प्राचीन ज्ञानपरंपरा असून, तिचे जागतिक स्तरावर क्रीडारुपाने संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. योगासनांच्या प्रसारासाठी संस्थात्मक कार्य, संशोधन आणि गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण यांची सांगड घालण्याचा आमचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे. ध्रुव ग्लोबल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी ब्रिक्सच्या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारतीय योगपरंपरेचे प्रतिनिधित्व करणे, ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना योग्य दिशा आणि संधी दिल्यास ते जागतिक स्तरावरही आपली गुणवत्ता सिद्ध करु शकतात, याचा हा प्रत्यय आहे.

डॉ.संजय मालपाणी
चेअरमन – ध्रुव ग्लोबल स्कूल

या महोत्सवात भारताने योगासन, मल्लखांब आणि केरळच्या प्राचीन युद्धकलेतील कलरीपयट्टू या तीन वैशिष्ट्यपूर्ण परंपरांचे सादरीकरण केले. चीनच्या वुशू आणि लायन डान्सपासून ब्राझीलच्या कॅपोएरापर्यंत, इराणच्या झुर्खानेहपासून कझाकिस्तानच्या पारंपरिक खेळांपर्यंत विविध देशांच्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांनी या सोहळ्यात रंग भरले. भारतीय योगासनांच्या लयबद्ध, शिस्तबद्ध आणि कलात्मक प्रात्यक्षिकांनी उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. योग ही केवळ व्यायामपद्धती नसून शरीर, मन आणि श्वास यांच्या समन्वयातून विकसित झालेली भारतीय ज्ञानपरंपरा असल्याचे खेळाडूंनी आपल्या सादरीकरणातून अधोरेखित केले.

आशियाखंडातील दहा बिक्स सदस्य देशांचा सहभाग असलेल्या या स्पर्धेत भारतीय योगपरंपरेचे सादरीकरण करणार्या पथकात संगमनेरच्या ध्रुव ग्लोबल स्कूलमधील आर्यन खरात, प्रणव साहू, अंश मयेकर, रोहन तायडे, तृसी डोंगरे, रुद्रांक्षी भावे, प्रांजल व्हन्ना आणि देवांशी वाकळे या आठ विद्यार्थ्यांचा समावेश होता. याशिवाय पुण्यातील ध्रुव ग्लोबल स्कूलची नीरल वाडेकर आणि शाळेची माजी विद्यार्थिनी तन्वी रेडीज यांनीही या आंतरराष्ट्रीय सोहळ्यात सहभाग घेतला. महाराष्ट्राच्या अधिकृत पथकाच्या यादीत अन्य खेळाडूंचाही समावेश होता. या पथकासोबत प्रशिक्षक चंचल माळी आणि व्यवस्थापक उमेश झोटिंग यांनी जबाबदारी सांभाळली. विद्यार्थ्यांमधील उपजत क्षमता ओळखून त्यांना शालेय शिक्षणाबरोबरच क्रीडाक्षेत्रातही व्यासपीठ उपलब्ध करुन देण्याची ध्रुव ग्लोबल स्कूलची भूमिका या सन्मानातून पुन्हा एकदा ठळक झाली. योगासनांसारख्या शारीरिक कौशल्य, मानसिक स्थैर्य, नियमित सराव आणि अचूकतेची कसोटी पाहणार्या क्रीडाप्रकारात विद्यार्थ्यांना घडविण्याची प्रक्रिया दीर्घकालीन आहे. ध्रुव ग्लोबलच्या योगासनपटूंनी स्थानिक स्तरापासून राष्ट्रीय आणि उपखंडीय स्पर्धांपर्यंत केलेल्या कामगिरीच्या पार्श्वभूमीवर या आंतरराष्ट्रीय सहभागाला विशेष महत्त्व आहे. अहमदाबादच्या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारतीय योगपरंपरेचे दर्शन घडविणार्या या सहभागाने संगमनेरच्या शैक्षणिक गुणवत्तेला नवा आयाम दिला आहे. स्थानिक मातीत रुजलेल्या प्रतिभेला योग्य प्रशिक्षण, शिस्त आणि संधीची जोड मिळाल्यास ती जागतिक व्यासपीठावरही आत्मविश्वासाने उभी राहू शकते, याचीच ही अभिमानास्पद साक्ष असल्याच्या प्रतिक्रिया उमटत आहेत.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
ताम्हाणे हॉस्पिटल
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25



कथित मतचोरीविरोधात संगमनेरमध्ये शिवसेनेसह समविचारी पक्षांचा एल्गार!

माजी खा. चंद्रकांत खैरे यांच्या उपस्थितीत रास्ता रोको; निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीचा निषेध

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - मतदार याद्यांमधील कथित अनियमितता, विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षणाची (एसआयआर) प्रक्रिया आणि मतचोरीच्या आरोपांवरून देशभरात राजकीय वातावरण तापले असताना, संगमनेरमध्ये शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षासह समविचारी पक्ष व संघटनांनी एकत्र येत निवडणूक आयोगाविरोधात जोरदार एल्गार पुकारला. मंगळवारी (दि. १३) सायंकाळी संगमनेर बसस्थानक परिसरात रास्ता रोको आंदोलन करून मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीचा निषेध नोंदविण्यात आला. माजी खासदार चंद्रकांत खैरे यांच्यासह विविध पक्षांचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी झाले होते.



शिवसेनेचे तालुकाप्रमुख अमर कतारी यांच्या नियोजनाखाली झालेल्या या आंदोलनात शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सचिन कोते पाटील, जगदीश चौधरी, जिल्हा संघटक अमोल बोऱ्हाडे, सहसंपर्कप्रमुख दिलीप साळगट, वंचित बहुजन आघाडीचे अजिज ओहरा, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे संकेत एखंडे, शिव आर्मी संघटनेचे दत्ता ढगे यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते. आंदोलनादरम्यान निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीविरोधात घोषणाबाजी करत मतदारांच्या मतदानाचा अधिकार सुरक्षित ठेवण्याची मागणी करण्यात आली. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सचिन कोते यांनी जोरदार घोषणाबाजी करत निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीविरोधात निषेध व्यक्त केला. दिल्ली, मुंबई आणि बेंगळुरू यांसारख्या शहरांतही या मुद्द्यावर आंदोलने होत असल्याचा संदर्भ देत त्यांनी आंदोलनकर्त्यांवरील कथित पोलीस कारवाईबाबत चिंता व्यक्त केली.

आमची लढाई निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीविरोधात आणि भ्रष्टाचारी भाजपवाल्यांविरोधात आहे; पोलिसांविरोधात नाही. त्यामुळे पोलिसांनीही आमच्या आंदोलनाला सहकार्य करावे, अशी भूमिका कोते पाटील यांनी मांडली.

शिवसेनेचे जिल्हाप्रमुख जगदीश चौधरी यांनी भाजप सरकारसह पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर टीका केली. मतदार याद्यांबाबत उपस्थित होणाऱ्या प्रश्नांची उत्तरे मिळाली पाहिजेत. लोकशाही व्यवस्थेत प्रत्येक मताला महत्त्व असून, निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेबाबत जनतेच्या मनात निर्माण झालेल्या शंकांचे निरसन झाले पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.

वंचित बहुजन आघाडीचे अजिज ओहरा, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे संकेत एखंडे आणि शिव आर्मी संघटनेचे दत्ता ढगे यांनीही एसआयआर प्रक्रिया आणि मतचोरीच्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर आपापली भूमिका मांडली.

या आंदोलनाला संगमनेर, अकोले आणि कोपरगाव तालुक्यांतील शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. प्रमोद अण्णा लबडे, उपजिल्हा संघटक पप्पू कानकाटे, रंगनाथ फटांगरे, भीमाशंकर पावशे, योगेश खेमनर, अमित चव्हाण, बाळासाहेब घोडके, विजय सातपुते, सदाशिव हासे, बाळासाहेब कवडे, अक्षय गुंजाळ, सागर भागवत, अमोल डुकरे, किशोर तरंगे, जनार्दन नागरे, एकनाथ खेमन, लखन भगत, मुश्ताक शेख, प्रविण टाकसाळ, रफिक शेख, सचिन लाटे, अकोले तालुकाप्रमुख महेश नवले, अजित हासे, दिलीप नवले, प्रभाकर फाफाळे आणि नितीन नाईकवाडे यांचा समावेश होता. तसेच भरत मोरे, बालाजी गोर्डे, भैय्या वालझडे, मयूर काळे, आबासाहेब पवार, निलेश वाणी, गगन हाडा, रहीम बेग, इरफान सय्यद, अल्ताफ शेख, अझीम अत्तार, आयनुर शाह, बाळासाहेब कुमकर, संदीप डोंगरे, सलमान शेख, संकेत शेटे, दत्ता कडू, राजू शेख, विजय गव्हाणे, नानक सावंत्रे, विजय कुमावत, कैलास लाटे, सचिन मोरे, नवनाथ हाफसे, साई पवार, आकाश परदेशी, विजू बोठे आणि प्रभाकर गेठे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पोपटराव वर्पे, संकेत एखंडे, इस्माईल शेख, गणेश अरगडे, गौरव जगताप, दत्तू वर्पे, सुफियान पठाण, संदीप मोकळ, अरबाज शेख, बाबा मोकळ आणि हीनाताई सोनवणे यांनीही सहभाग नोंदविला.

महिला आघाडीच्या राजश्री राहणे, काजल राठोड, सपन देसाई, वैशाली वडतल्ले आणि आरती मसराम यांच्यासह विविध महिला पदाधिकारी उपस्थित होत्या. तसेच वाहतूक सेनेचे अशोक बढे, राजू सय्यद, विजय माघाडे, सुनील मोरे, विलास काळे, कैलास गायके, यांच्यासह विविध पदाधिकारी व शिवसैनिकांनी आंदोलनात सहभाग घेतला.

चंद्रकांत खैरे यांच्याकडून निवडणूक प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह

माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी आपल्या भाषणातून देशातील निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेचा आणि निष्पक्षतेचा मुद्दा उपस्थित केला. मतदार याद्यांमधील कथित घोळ, एसआयआर प्रक्रिया आणि मतचोरीच्या आरोपांबाबत निवडणूक आयोगाने स्पष्ट भूमिका मांडावी, अशी मागणी त्यांनी केली. लोकशाहीमध्ये मतदारांचा विश्वास हा सर्वाधिक महत्त्वाचा असून, निवडणूक प्रक्रियेबाबत निर्माण झालेल्या शंकांचे निरसन करणे ही संबंधित यंत्रणांची जबाबदारी असल्याचे आंदोलनकर्त्यांनी नमूद केले.

संगमनेरमध्ये 'मुळचंद होलसेल मिल डेपो' ग्राहकांच्या सेवेत

ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद!



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पुणे येथील प्रसिद्ध मुळचंद होलसेल मिल डेपो या नवीन कापड दालनाचा संगमनेर येथे उत्साहात शुभारंभ झाला. दुकानाच्या प्रारंभापासूनच ग्राहकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याने परिसरातील कापड बाजारपेठेत या नव्या दालनाची चर्चा सुरू झाली आहे. विविध प्रकारचे आकर्षक कपडे एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्यामुळे ग्राहकांसाठी खरेदीचा नवा पर्याय निर्माण झाला आहे. या शुभारंभ सोहळ्यास माजी मंत्री बाळासाहेब थोरात, आमदार सत्यजित तांबे, माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे, नगराध्यक्षा मैथिली तांबे यांच्यासह नगरसेवक दिलीपराव पुंड, गजानन अभंग, सुभाष ताजने, तुषार शिंदे, सुदाम अभंग आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या उपस्थितीत या नवीन कापड दालनाचा शुभारंभ करण्यात आला.

'मिल डेपो ते ग्राहक' ही संकल्पना ठरणार आकर्षण -

मुळचंद होलसेल मिल डेपोचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे 'मिल डेपो ते ग्राहक' ही संकल्पना होय. ग्राहकांना विविध प्रकारचे कापड आणि कपडे एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यावर या दालनाचा भर आहे. महिलांसाठी आकर्षक आणि विविध प्रकारच्या साड्या, लेडीज वेअर, लहान मुलांसाठी सुंदर कपडे तसेच इतर विविध प्रकारच्या कपड्यांची उपलब्धता हे या दालनाचे प्रमुख आकर्षण आहे. सण-उत्सव, लग्नसराई, कौटुंबिक कार्यक्रम तसेच दैनंदिन वापरासाठी आवश्यक असलेल्या कपड्यांच्या खरेदीसाठी ग्राहकांना येथे विविध पर्याय मिळणार आहेत. कपड्यांची विविधता आणि ग्राहकांना एकाच ठिकाणी खरेदीची सुविधा मिळत असल्याने या दालनाकडे ग्राहक आकर्षित होत आहेत.

संगमनेर शहर हे परिसरातील महत्त्वाचे व्यापारी केंद्र असून, येथे नव्या व्यावसायिक दालनाची भर पडली आहे. पुण्यातील मुळचंद होलसेल मिल डेपोने संगमनेरमध्ये सुरू केलेल्या या नवीन उपक्रमाला ग्राहकांचा मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद उत्साहवर्धक ठरत आहे. आगामी काळात हे दालन ग्राहकांच्या पसंतीस उतरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

पान १ वरून

ज्ञानेशकुमार...

हे एकाच समान ध्येयासाठी आणि उद्दिष्टासाठी सुरू आहे, असे दिपके यांनी स्पष्ट केले. दुसरीकडे दिल्लीत उगझ च्या आंदोलकांना कारवाईला सामोरे जावे लागले आहे. मंगळवारी सकाळी जंतरमंतर येथे सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान दिल्ली पोलिसांनी उगझ चे आशुतोष रांका, सौरव दास आणि अजिंक्य शिंदे यांना ताब्यात घेतले होते. त्यानंतर पहाटे ३ वाजता या तिघांवर प्रतिबंधात्मक कारवाईअंतर्गत अटकेची कारवाई करण्यात आली. बुधवारी सकाळी या तिघांनाही दिल्लीतील विशेष न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी न्यायालयाने आशुतोष रांका आणि सौरव दास या दोघांना ५ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. तर, त्यांच्यासोबत अटक करण्यात आलेले अजिंक्य शिंदे यांची वैयक्तिक जातमुचलक्यावर सुटका करण्यात आली आहे.













दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25